
# माणूस

जून एकोणिसशेबहात्तर

पन्नास पै



माणूस
शनिवार
३ जून १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : एक

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

प्रकाशित लेख, चित्रे
इत्यादींबाबतचे हक्क
स्वाधीन. अंकात व्यक्त
झालेल्या मतांशी 'माणूस'
साप्ताहिकाचे चालक
सहमत असतीलच
असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे
काल्पनिक.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.
दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

## सप्रेम नमस्कार...

२४ मे, १९७२

□ 'स्नेहयात्रा' वाचत आहे. नंदादीपासारखी वाटते. सौम्य पण जिवंत प्रकाश असलेली. कोणत्याही प्रकारचा हव्यास, अभिनिवेश नाही की, विद्वत्तेचा, काहीतरी पाहिल्याचा उगीच पवित्रा नाही. आहे ते सगळे मनःपूर्वक. दाट सायीसारखे सकस आहे.

फ्रान्समध्ये विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची किती मार्मिक उत्तरे दिली आहेत तुम्ही! मधूनच मित्रांची, परिचितांची येऊन जाणारी शब्दचित्रे, तुमच्या संवेदनशील, उत्कट मनाचे चिंतन, वागण्यात व विचारात असलेला (की जो भारतीय नागरिक परदेशात गेल्यावर कधीही दाखवीत नाही असा) समंजस सावधपणा तुमच्या लेखनातून प्रत्ययाला येतो. तुमच्या सगळ्याच लेखनाचे मुख आत आहे. केवळ ऊर्मी व्यक्त करण्यासाठी ते लिहिले जात आहे, असे वाटते. आजच्या स्त्री-लेखिकांत अतिशय दुर्मिळ असलेले हे गुण आहेत.

पण मराठी साहित्याचे दुर्दैव असे, की अशा प्रकारचे लेखन चटपटीत, खमंग, मनोरंजक, भडक वाचनाची चटक लागलेल्या वाचकाला कितपत आवडते शंका आहे. ...'माणूस'च्या वाचकांची यात खरी परीक्षा होणार आहे.

आनंद यादव, पुणे

# मुंबई वार्ता

## बोलविता धनी कोण ?

**प्रतिनिधी**

खरं म्हणजे गेल्याच आठवडयात मी या उपोषणासंबंधी लिहीणार होतो. लिखाणासाठी माहितीची जमवाजमवही केली होती, पण ते उपोषण म्हणजे निव्वळ थिल्लरपणाचा उत्तम नमुना होता आणि उपोषणाला म्हणावा तसा रंगही त्या वेळी चढला नव्हता. तसे म्हणायचे तर आजसुद्धा उपोषणात विशेष दम नाहीच. पण या उपोषणाच्या निमित्ताने काही प्रश्न उपस्थित होतात. त्यांची दखल घेतलीच पाहिजे.

श्रीमती एस् जी. पी. अथाईड या माजी आमदार आहेत आणि नवकाँग्रेसच्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या सदस्या आहेत. मुंबई प्रदेश काँग्रेस समितीच्या ‘ हाऊस रिपेअर सेल्स ’च्या त्या अध्यक्ष आहेत. तेव्हा त्यांच्यासारख्या ‘ वजनदार ’ व्यक्तीने उपोषण केल्यामुळे साहजिकच संबंधितांच्या वर्तुळात त्याची चर्चा झाली. त्यातच बॅ. रजनी पटेल यांच्या घटस्फोटित पत्नी श्रीमती सुशीला पटेल यांनी अथाईडबाईंना पाठींबा दिल्याने त्या घटनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

अथाईडबाईंनी श्री. पटेल यांच्यावर ‘ व्यभिचार व व्यभिचाराला उत्तेजन देणे, ’, बी. पी. सी. सी. साठी ‘ गैरमार्गाने ’ निधी मिळविणे, डॉ. शांती पटेल नाना चुडासामा यांच्यासारख्यांना खऱ्या समाजवादी (नवकाँग्रेस) पक्षात घेणे (घेण्याचे पाप करणे) आदि प्रकारचे गंभीर आरोप केले आहेत. श्री. पटेल यांना बी. पी. सी. सी. च्या अध्यक्षपदावरून दूर करण्यासाठी हे उपोषण सुरू झाले. निदान काँग्रेस हाय कमांडने त्यांच्यावरील आरोपांची चौकशी पूर्ण होईपर्यंत तरी त्यांना अध्यक्षपदावरून दूर ठेवण्याची त्यांनी मागणी केली.

उपोषण सुरू झाल्यानंतर एकदोन दिवस बाई हिरॉइन होत्या. अनेकांची सहानुभूती त्यांनी मिळवली. बी. पी. सी. सी. चे इतर पदाधिकारी अगदी हादरून गेले.

काँग्रेस पक्षाची, युथ काँग्रेस वगैरेसारखी इतर युनिट्स काय भूमिका घेतात, आपले पारडे त्यामुळे जड होणार की श्रीमती अथाईड यांचे, याची त्यांना चिंता लागून राहिली होती. आता मात्र अथाईडबाईंच्या उपोषणातील हवा बऱ्याच प्रमाणात निघून गेली आहे. पटेल यांची उचलबांगडी होईपर्यंत 'बेमुदत' उपोषण करणार अशी घोषणा करणाऱ्या बाईंनी आता 'लोकांचे लक्ष वेधण्याचा आपला हेतू साध्य झाला असल्याने ३० तारखेनंतर उपोषण मागे घेणार' असल्याची घोषणा केली.

सुरुवातीला उपोषण मागे घेण्याची विनंती करण्याकरिता काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी वजन खर्च केले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. या उपोषणामुळे गर्भगळीत झालेल्या श्री. पटेल यांच्या चेल्यांनी प्रतिउपोषणाच्या वल्गना केल्या. त्याप्रमाणे दोन-तीन दिवसांपूर्वी श्री. अलिखान गुलामअलिखान या बी. पी. सी. सी. च्या कार्यकर्त्याने प्रतिउपोषणाला आरंभ केला. ते जिथे बसले होते तिथे एक फलक होता– 'आपल्या पायाजवळ काय जळते आहे ते पाहा.'

प्रदेश काँग्रेसच्या काही लोकांनी पत्रक काढले. 'आम्हाला पटेलांशिवाय इतर कुणाचेही नेतृत्व नको.' अथाईडबाईंच्या शुद्ध चारित्र्याबद्दलही दाट संशय त्यात व्यक्त करण्यात आला. आमदारकी प्रिय, मतलबी वगैरे आरोप त्यांच्यावर करण्यात आले. 'पटेलांनी घटस्फोट घेतला तर अथाईडबाईंना अवघड वाटण्याचे कारण काय, हा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे.' वगैरे गोष्टींचा पाढा वाचण्यात आला. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

बी. पी. सी. सी. ने तर त्यांना पक्षाबाहेर हाकलावे असा ठराव करून तो ए. आय. सी सी. कडे पाठविला. हा ठराव पास होण्याची चांगलीच शक्यता आहे. असे असले तरी एक गोष्ट सत्य आहे की श्रीमती अथाईड यांना बऱ्याच मोठ्या प्रमाणात काँग्रेसजनांचा पाठींबा आहे.

पण हे सारे रामायण घडत असताना बॅ. रजनीभाई मुंबईत नव्हते. ते तामिळ-नाडूमधील एका थंड हवेच्या ठिकाणी गेले होते.

## उपोषणाची हीच वेळ का ?

श्रीमती अथाईड यांनी उपोषणासाठी हीच वेळ का निवडावी याबद्दल कोणालाही ठामपणे काहीच तर्क करता येत नाही. मुंबई महापालिकेच्या निवडणुका अजून तशा बऱ्याच दूर आहेत. उपोषणाला सुरुवातही अचानकपणेच झाली. उपोषणाला बसण्याच्या दिवसापर्यंत त्या त्यांच्या बी. पी. सी. सी. च्या ऑफिसमध्ये काम करीत होत्या. त्यांना त्यांच्या कामात पूर्ण स्वातंत्र्य होते. प्रदेशाध्यक्षांनी त्यांना तसे निःसंदिग्धपणे सांगितले होते. अलिकडेच सिलिंगच्या प्रश्नावर मुख्यमंत्री व श्री. रजनी पटेल यांच्यात एक थोडासा वाद निर्माण झाला होता. त्या वेळी बी. पी. सी. सी. ची एक बैठक झाली होती. त्या बैठकीत अथाईडबाईंनी श्री. पटेल यांना मोकळेपणे अनेक प्रश्न विचारले होते आणि त्यांनीही त्यांचा समाधानकारक

पृष्ठ ६३ वर

## मुक्काम पुणे

# उद्‌घाटनाचा एक नेटका समारंभ

**शरद कृष्णन्**

भाऊसाहेब बांदोडकर आज पुण्यात होते, ते खास दैनिक तरुण भारतच्या कार्यक्रमासाठी. नातूबागेतील दैनिक तरुण भारतची नवी इमारत व रोटरी मशीन यांच्या औपचारिक उद्‌घाटनाचा कार्यक्रम त्यांच्या हस्ते साजरा झाला. तसा तरुण भारत आपल्या नवीन वास्तुमध्ये आणि नवीन मशिनवर पूर्वीच गेला आहे. भाऊसाहेबांच्या हस्ते झालेल्या आटोपशीर समारंभाने सर्व संबंधितांना झालेला आनंद थेट जनतेपर्यंत पोचला. शिवाय समारंभाच्या निमित्ताने बांधणी अवस्थेमध्ये असलेल्या वास्तूवरूनही अगदी 'दिवाबत्तींच्या' प्रकाशात अखेरचा हात फिरवला गेला.

समारंभाच्या निमित्ताने नवीन इमारत, भडकपणा तर वाटू नये आणि डौल तर जरूर वाढावा अशा पद्धतीने सजवली होती. सध्या इमारतीचा तळमजला आणि पहिला मजला पूर्ण झाला आहे. संपादकीय मंडळी सर्व बोजा आपल्या शिरावर घेऊन तळघरात बसतात. तर भाऊसाहेबांच्या हस्ते तासाला तीस हजार प्रती फेकणारे हायस्पीड प्लॅमॅग रोटरी मशीन आणि अन्य सर्व प्रेस विभाग एका प्रशस्त हॉलमध्ये कार्यमग्न झाला आहे.

इमारत आणि मशीन उद्‌घाटनाचा जागेवरील कार्यक्रम झाल्यावर सरस्वती मंदिर हायस्कूलच्या मोकळ्या मैदानावर उभारलेल्या व्यासपीठावर मंडळी गेली आणि खऱ्या समारंभाला सुरुवात झाली. असा समारंभ जसा व्हायला पाहिजे अगदी तसाच हा समारंभही झाला. परंतु काही समारंभातून जो एक कृत्रिमपणा असतो तसा येथे आढळला नाही. बोलणारे वक्ते, वावरणारे कार्यकर्ते, ऐकणारे श्रोते,

या सर्वांनाच काही विशेष आत्मीयता असल्याचे जरूर जाणवले. अर्थात हे जसे जाणवले तसेच तरुण भारतच्या हितचिंतकांचा, वाचकांचा हा वर्ग या दैनिकाच्या राजकीय, सामाजिक बैठकीचे चित्रही डोळयासमोर उभे करून गेला.

सर्वच वक्ते तसे चांगले मुद्देसूद आणि आटोपशीर बोलले. संपादक बापूराव भिशीकर यांनी तरुण भारतच्या प्रगतीचा आढावा घेतला. तरुण भारतचे धोरण सुस्पष्ट केले, आणि अकारण जाती-विद्वेषाचे लिखाण केल्याचा आरोप करून केंद्रीय सरकारने जाहिरात कशी तोडली याचा किस्सा सांगितला. तरुण भारतचे वृत्त-संपादक वसंतराव गीत यांनी संदेश वाचन केले. वृत्तपत्राचे प्रातिनिधीक स्वरूप स्पष्ट व्हावे अशा प्रकारे थेट साहेबांच्या संदेशापासून ते अगदी मुस्लीम मारूफखानांपर्यंत सर्वांना त्यात गोवले होते. राजकीय नेते, साहित्यिक, उद्योगपती, सामाजिक कार्यकर्ते, मागासलेल्या समाजातील मंडळी—अशी ही संदेशाची भरघोस माळ होती.



समारंभाचे मुख्य पाहुणे
भाऊसाहेब बांदोडकर
प्रवेश करताना

समारंभाचे खरे लक्ष होते भाऊसाहेबांवर आणि नागपूरहून येऊन अध्यक्षपद भूषवणाऱ्या बाळासाहेब देवरस यांच्यावर. भाऊसाहेब तर विलक्षण थकलेले दिसले. मात्र आपल्या आशिर्वादपर छोटेखानी भाषणामध्येही त्यांनी गोव्यात त्यांना त्रास देणाऱ्या दैनिकाला कोपरखळी दिली. बाळासाहेब देवरस यांच्या भाषणाचा तोंडवळाही पुष्कळसा बापूराव भिशीकर यांच्या भाषणासारखाच होता. दैनिकाला पडणाऱ्या स्वाभाविक मर्यादा, येणाऱ्या अडचणी, वृत्तपत्राबाबतचे शासकीय धोरण अशा विविध मुद्यांचा त्यांनी नागपूर—तरुण भारतचा संदर्भ देत उल्लेख केला. आ. रा. भट यांचे भाषण तर पुष्कळच तांत्रिक स्वरूपाचे. त्यांचा रोख वृत्तपत्राच्या

आर्थिक बाजूंवर होता. प्रत्यक्ष उत्पादनखर्चापेक्षाही कमी किमतीस आपला माल विकणारा एकमेव व्यवसाय अशा या व्यवसायाचा उल्लेख करून पाने–किमतीचे कोष्टक लहान वृत्तपत्रांना लाभदायक ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. एकूण उपलब्ध जागेपैकी किती जागा जाहिरातीसाठी द्यावी याचे काही ताळतंत्र असले पाहिजे. आणि चाळीस टक्क्यापेक्षा ही मर्यादा वाढू दिल्यास वृत्तपत्राला जाहिरातपत्राचे स्वरूप येते आणि वाचकांचा दृष्टिकोन बदलतो असा नवीन मुद्दा पुढे मांडला.

पुण्याचे महापौर भाऊसाहेब चव्हाण यांचेही प्रसंगोचित भाषण झाले. आपल्या महापौरांची परंपरा भाषणे करण्याची आहे. प्रसंगोचित भाषणे करण्याची तर नाहीच. त्यामुळे भाऊसाहेबांच्या भाषणावर आपण तर चक्क खूष झालो. वृत्तपत्राला त्यांनी दिलेली मधमाशांच्या पोळयाची उपमाही आवडली. फक्त या उपमेवरील त्यांचे विवरण समाधानकारक वाटले नाही. त्यामानाने बाळासाहेब देवरस यांनी वृत्तपत्रे आणि डेअरी यांची सांगड जास्त चांगली घातली. आभाराचा उपचार पूर्ण झाल्यावर छोटया दैनिकाच्या आयुष्यातील एका महत्त्वाच्या टप्प्याची नोंद घेणाऱ्या या छोटेखानी समारंभाची सांगता झाली.

## खडतर वाटचाल

गेली पंधरा वर्षे पुण्याहून निघणाऱ्या तरुण भारतची ही वाटचाल इतकी सहज-सुलभ नाही. सकाळ, केसरी सारखी प्रस्थापित वृत्तपत्रे असलेल्या पुण्यासारख्या ठिकाणी नवीन वृत्तपत्राने आव्हान देण्याइतक्या सामर्थ्याने उभे राहावे, ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही. बाह्यात्कारी प्रेम आणि आपुलकीचा कितीही आव आणला, तरी स्पर्धेची प्रत्येक आघाडी पूर्ण ताकदीने लढवून नवीन दैनिकाची कोंडी केली जाते. यात काही वावगे आहे असे नव्हे. स्पर्धात्मक व्यवसायाचा तो एक अपरिहार्य भाग आहे. अशा या स्पर्धेच्या क्षेत्रात १९५७ साली दैनिक काळच्या इमारतीतील पेनी डॉसन या डबलफीडर सिलेंडर मशिनवर २० जानेवारी १९५७ ला पाच हजार प्रतींचा तरुण भारतचा पहिला अंक निघाला. तरुण भारतच्या राजकीय बैठकीशी जवळीक सांगणारा वाचक अंक विकत घेऊनच वाचणारा असल्याने हा वाचक हा एक मोठा असेट होता. तथापि हा विशिष्ट वाचक समोर न ठेवता तरुण भारतला जास्तीत जास्त व्यापक स्वरूप देण्याचे प्रयत्न झाले. प्रयत्नांना यश येत गेले. जुने रोटरी घेऊन अंकांची वाढती गरज पुरवली गेली. परंतु मागणी वाढतच राहिली. टिळक पथावरील जागा अपुरी वाटू लागली आणि मालक मंडळी नवीन जागेच्या शोधात हिंडू लागली. आणि नातूबागेमध्ये ऐन मध्य-वस्तीत सुमारे ५५ हजार चौरस फुटांची जागा उपलब्ध झाली. जागेच्या मालक श्रीमती स्मितसीता नातू यांच्याशी बोलणी करून सुमारे साडेतीन लाख रुपयास जागा पदरात पडली. जुन्या टिळक-पथावरील जागेला मशिनसुद्धा गिऱ्हाईक मिळाल्याने व चांगली अडीच-तीन लाखाची रक्कम पदरी पडल्याने व्यवहारीक

बाजूवरील ताण कमी झाला. जुनी जागा विशिष्ट मर्यादेमध्ये नवीन मालकाला खाली करून देण्याचे बंधन होते. या बंधनाच्या दडपणामुळे नवीन जागेतील बांधकाम लवकर पूर्ण झाले. वाढीव महत्त्वाकांक्षेचे क्षेत्र लक्षात घेतले तरीही तरुण भारतला 'जागा' हा प्रश्न आता उरलेला नाही. अगदी आता अत्तापर्यंत वीस-बावीस हजारापर्यंत घुटमळणाऱ्या तरुण भारतनें गेल्या पाच वर्षांत पंचेचाळीस हजाराच्या घरात उडी मारली आहे. तर साप्ताहिकाची उडी पाच-पंचावन्न हजारापर्यंत गेली आहे.

दैनिक तरुण भारतची छपाई हा पूर्वी एक चेष्टेचा विषय होता. आमच्या वृत्तपत्र वर्तुळामध्ये तर 'टी. बी.'च्या छपाईवर किती तरी किस्से ऐकवण्यात आले. या टीकेची धार या छपाईपर्यंत आजपर्यंत पोचत नव्हती. नवीन मशिनवरील अंक छपाईबाबतचा हा दुर्लौकिक घालवतील असे वाटते.

कुणाची इच्छा असो नसो, कुणाला आवडो न आवडो स्वतःचे कर्तृत्व, वाचकांची सहानुभूती आणि क्रियाशील हितचिंतक यांच्या सक्रीय प्रयत्नातून एक नवीन वृत्तपत्र आकारले आहे आणि त्याचा पुढील बहरही लक्षणीय ठरणार आहे.

## वसंत व्याख्यानमाला

सुट्टीच्या मोसमात ज्याच्याकडे लक्ष लागून राहावे अशा नियमित कार्यक्रमामध्ये आमच्या वसंत व्याख्यानमालेचा उल्लेख करावा लागेल. या व्याख्यानमालेला कोणताही विषय वर्ज नाही. चंद्रावर गेलेल्या मानवावरील शास्त्रीय व्याख्यान तुम्हाला येथे ऐकायला मिळेल. शिवाजीराव भोसले यांच्या वेदांताचे तुम्ही श्रवण भक्त होऊ शकाल. नाटकासिनेमाचा विषयही ही व्याख्यानमाला तितक्याच जिव्हाळ्याने हाताळेल. आता या सत्रातील हे सर्वच्या सर्व म्हणजे तीस-बत्तीस कार्यक्रम ऐकण्याचे धाडस ज्याला व्यवसायाचा भाग म्हणून ही भाषणे ऐकावी लागतात अशी बातमीदार मंडळी आणि घरी वेळ न गेल्याने न्यू इंग्लिश स्कूलच्या खुल्या हवेत आलेली पेन्शनर मंडळी यांच्याखेरीज कोणी करू शकणार नाही. आता नुकत्याच पार पडलेल्या ज्ञानसत्रामध्येही एकूण ३३ कार्यक्रम सादर करण्यात आले. प्रारंभी उद्घाटनाची हजेरी, आणि साहेबांच्या हस्ते झालेला समारोपाचा कार्यक्रम याखेरीस आपण ५–७ कार्यक्रमाला उपस्थित होतो. संगीत नाटके पूर्व पुण्याईवर किती दिवस चालणार? या विषयावरील सौ. सुहासिनी मुळगावकर यांचे व्याख्यान चांगले रंगले. तर सखाराम बाईंडर सध्या गाजत असल्याने नानासाहेब गोरे यांच्या 'आपण अश्लील होत आहोत काय?' या विषयावरील व्याख्यानही चांगले रंगले. आपल्या मुद्देसूद भाषणाने विषयाची रंगत वाढवण्याचे नानासाहेबांचे कौशल्य वादातीत आहे. उपस्थित प्रेक्षकांची नाडी अचूक हेरून भाषण खुलवण्याच्या दृष्टीने विषयाला झोके देण्याचे त्यांचे तंत्र या भाषणाचे वेळीही त्यांनी वापरले. श्लील-अश्लीलतेच्या

कसोटीवर प्रतिगामी पुरोगामीत्वाचा एक झोंबता दाखला त्यांनी दिला. माझी भाषा जुन्या पद्धतीची म्हणून मी प्रतिगामी—मी गोव्याच्या सत्याग्रहाचे वेळी वृद्ध वडिलांना नमस्कार केला. ते म्हणाले, 'तू गेलास तर तुझी माझी भेट होणार नाही, तू जाऊ नकोस,' मी नकार दिला. हाच सौम्य शब्दातील नकार मी 'चुतडीच्या मला तिकडे जायलाच पाहिजे, त्यात तुझ्या बापाचे काय जाणार?' या माझ्या उद्गारांवर त्यांनी 'तू माझा एकुलता एक मुलगा आहेस' असे म्हटले असते आणि मी त्यांना 'मग भडव्या हा दोष कुणाचा, तुझा की माझा,' असा दिला असता तर मी पुरोगामी ठरलो असतो. नानासाहेबांच्या भाषणाचा एकंदर सूर अश्लीलता वाढत आहे असे सांगणाराच होता.

जुळी मुंबई या पेटत्या विषयावर आमदार मृणाल गोरे यांचे अभ्यासपूर्ण भाषण झाले. सत्याऐंशी खेड्यांचे जीवन उध्वस्त करून, जुन्या मुंबईचे प्रश्न तसेच कायम ठेवणारी योजना असे जुळ्या मुंबईचे वर्णन करून लोकसंख्या ते संरक्षण अशा विविध प्रश्नांचा दाखला देऊन त्यांनी योजनेला प्रखर विरोध केला.

पन्नालाल सुराणा, विनायक भावे यांच्या जहाल भाषणांनी सकाळकारांना जागे केले. असले भडक वक्ते आणल्याबद्दल अग्रलेख लिहून त्यांनी मालेच्या संचालकांची कानउघाडणी केली.

'पत्रकारांना पछाडणारी पाच भुते' असा विषय नवाकाळकार खाडीलकर यांना दिला होता. हा विषय तसा विचित्र होता. तथापि खाडीलकरांनी विषयाला आकार चांगला दिला. प्रा. रा. म. बापट यांचे 'लोकशाहीपुढील आजचे प्रश्न' या विषयावरील व्याख्यान फार अॅकॅडमिक स्वरूपाचे झाले. त्या मानाने 'केंद्र सरकार व घटक राज्ये' या विषयावरील मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉ. त्र्यं. कृ. टोपे यांचे व्याख्यान जास्त जिवंत वाटले. चटकन् पटणाऱ्या उदाहरणासह विषयाचे विवेचन करण्याच्या संधीचा लाभ त्यांनी पुरेपूर उठवला. ऐकलेल्या भाषणांपैकी ज्यांची दखल घ्यावी अशी ही व्याख्याने तर विरंगुळ्याच्या कार्यक्रमांपैकी साहित्यिक मंडळींचा कथा कथनाचा कार्यक्रम आवडला.

ज्ञानसत्राचा समारोप यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी मराठी व्यासपीठावरील सदासतेज म. म. द. वा. पोतदार होते. साहेबांच्या डोक्यावर राजकीय आघाडीवरील घडामोडीचे टेन्शन सतत असते. पण चांगला श्रोतृवृंद असला तर संस्कृतिक कार्यक्रमामध्ये ते चांगले रंगतात. तथापि या वेळचे 'राष्ट्रीय जीवनाच्या नवीन दिशा' या विषयावरील त्यांचे भाषण प्रचारकी थाटाचे होते. विवेचन पद्धतीमध्ये नेहमीचा जिव्हाळा होता. चटकन भिडणारे दाखले होते. म. म. द. वा. पोतदार यांनी मालेतील दोष आगामी वर्षात दूर करून दोन वर्षांनी येणाऱ्या शताब्दीची चाहूल नोंदवली आणि महिनाभर चाललेल्या या ज्ञानसत्राची सांगता झाली.

एप्रिल-मे म्हणजे शाळेतील पोरांचे चैनीचे दिवस. खाना-पिना मजा करना अशा वृत्तीने विहार करणाऱ्या या पोरांवर जी मंडळी लक्ष ठेवून असतात त्यात बाल-नाटयवाले आघाडीवर. स्वस्त्या दरातील सकाळची बालनाटचे पाहायला ही पोरे मोठ्या हौशीने येतात. स्वाभाविकपणेच नव्या-जुन्या बालनाटयांची एकच झुंबड उडालेली असते. 'आम्ही आपले खुळोबा खुळोबा', 'गोपालकृष्ण राधेकृष्ण', 'न रडणारी राजकन्या' या जुन्या बालनाटयांच्या जोडीला 'इकडम तिकडम विजयी विक्रम' या नवीन बालनाटयाने या वेळी हजेरी लावली. बालनाटयांमध्ये ॲक्शन आणि मनोरंजन यांचा मेळ घालावा लागतो. त्यादृष्टीने या प्रयोगाची बैठक छान जमली होती. सुषमा परांजपे आणि दीपक माहुलीकर या प्रमुख कलाकारांनी झकास कामे करून दाद घेतली. परंतु जमलेल्या बाल गोपाळांवर खरी मोहिनी घातली 'इकडम तिकडम' आणि 'अळम टळम' या मंडळींनी. बालप्रेक्षकांची चांगली उपस्थिती ही निर्वीवादपणे समाधानाची बाब होती.

## बाल आनंद मेळा

नाटक मुलांचे म्हटले तरी ती काहीशी एकांगी करमणूक. मुलांच्या करमणूकीचे खरे क्षेत्र खुले केले बालबोधपीठ या संस्थेच्या बाल आनंद मेळयाने. बाबा कंपनीला ज्या ज्या गोष्टीत रस त्या प्रत्येक बाबींची दखल या मेळाव्याने घेतली. संगीत, वाचनालय, कथा कथन, रेकॉर्डस, खेळणी, चित्रकला अशी विविध दालने खोलण्यात आली होती आणि आपल्याला हव्या त्या दालनात जाऊन मन मानेल तसा आनंद लुटण्याची मुभा मुलांना देण्यात आली होती. मार्गदर्शन नाही. तसेच इकडे हात लावू नको, तिकडे जाऊ नको, असला धसक-फसक प्रकार नाही. या मिळालेल्या स्वातंत्र्याचा बालचमूंनी भरपूर लाभ उठवला. शिवाय आपल्या आई-दादांचाही त्रास नाही. कारण बालकांच्या या आनंदमेळयामध्ये मोठयांना मज्जाव होता. सर्वत्र मुलांचेच राज्य. दृश्य तसे विलोभनीय होते. संगीतदालनात वाद्यांची मजा लुटावी, चित्रकला दालनात स्वतःच्या कुंचल्याला पूर्ण स्वातंत्र्य द्यावे. खेळण्याचे दालन – तिथे तर एकच झुंबड – अजब-गजब खेळण्यांची भरपूर सोय संयोजकांनी करून ठेवली होती. अगदीच कंटाळा आला तर कथा-कथन विभाग होताच. आण्णा माडगूळकर, सरिता पत्की, राजा मंगळवेढेकर या सारखी मातब्बर मंडळी रंजन करण्यास सिद्ध होती.

असा हा अजब आनंद मेळा. त्याचा लाभही मोठ्या प्रमाणात उठवला गेल्याने संयोजकांना घेतल्या श्रमाचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

□ □ □

केनेडी–जॉन्सन कारकीर्दीतले
सेक्रेटरी ऑफ स्टेट डीन रस्क यांची
अमेरिकेतील आगामी निवडणुका
भारत-पाक युद्ध, भारत-अमेरिका संबंध
या प्रश्नावर एका भारतीय विद्यार्थ्याने
घेतलेली मुलाखत..

# ...JUST FORGET ABOUT U. S.

राजकारणातून निवृत्त होऊन आपल्या जन्मगावी परतण्यात प्राध्यापक डीन रस्क यांना जेवढा आनंद झाला तेवढाच आनंद त्यांच्या आगमनामुळे त्यांच्या जॉर्जीयातील चाहत्यांना झाला. डीन जॉर्जीयात आल्यापासून त्यांच्या भेटीची मलाही उत्सुकता लागून राहिली होती. अखेर एकदाचा योग आला. अॅथेन्स (जॉर्जीया) मध्ये आम्ही भारतीयांना प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने 'इंडिया नाईट' सादर केली त्या वेळी केनेडी व जॉन्सन कारकीर्दीतले सेक्रेटरी ऑफ स्टेट डीन रस्क यांना प्रमुख पाहुणे म्हणून येण्याची आम्ही विनंती केली व त्यांनी ती लगेच मान्यही केली. कार्यक्रमानंतर आम्हा भारतीय तरुण विद्यार्थ्यांशी डीन गप्पा मारत होते. त्याच वेळी एखाद्या संध्याकाळी त्यांची भेट घेण्याची इच्छा मी प्रदर्शित करताच डीनने लगेच होकार दिला.

त्यानंतर बरेच दिवस निघून गेले. व्याख्याने दौरे आणि कॉलेज यामुळे डीनना वेळ मिळत नव्हता. अखेर एका रविवारी डीन यांच्या घरी भेटीची वेळ ठरली. मी, बाळ व प्रवीण डीन यांच्या घरी बरोबर चार वाजता पोहचलो, तेव्हा डीन घरासमोरील अंगणातील पालापाचोळा झाडूने साफ करीत होते. हस्तांदोलन वगैरे झाल्यावर आम्हाला बंगल्यातील एका आतल्या प्रशस्त खोलीत नेण्यात आले. अन् मनमोकळ्या गप्पांना सुरुवात झाली. अमेरिकेतील अंतर्गत राजकारणानी सुरुवात करावी या हेतूने मी अध्यक्षीय प्राथमिक निवडणुकांचा विषय काढला.

सिनेटर मस्कींच्या पराभवामुळे मी आश्चर्य प्रकट केले तेव्हा डीन म्हणाले, "खरे म्हणजे सिनेटर मस्कींच्या पराभवामुळे आश्चर्य वाटावयास नको. मस्की हे मध्यम विचारप्रणालीचा पुरस्कार करणारे उमेदवार होते व प्राथमिक निवडणुकांमध्ये जॉर्ज वॉलेस व मॅकगव्हर्न यांच्यासारख्या उजव्या व डाव्या विचारप्रणालीचे

जगदीश राऊत
अॅटलांटा, जॉर्जिया

# AND WORK ON YOURSELF – डीन रस्क

उमेदवार मतदारांना जास्त प्रभावित करतात. १९७० साली डेमॉक्रॅटिक पक्षाचा राष्ट्रीय प्रवक्ता म्हणून राज्यपाल निवडणूकीच्या वेळी जरी मस्की यांनी चांगली कामगिरी बजावली असली तरीही डेमॉक्रॅटिक पक्षामध्ये त्यांचा विशेष जोर नव्हता. पूर्वी ते मेन या छोटयाशा राज्याचे राज्यपाल होते. गेल्या निवडणुकीत उपाध्यक्षीय उमेदवार म्हणून त्यांनी चांगली मते मिळवली परंतु त्या वेळचे अध्यक्षीय उमेदवार त्यांचे यावेळचे प्रतिस्पर्धी होते ही गोष्ट विसरता येणार नाही. शिवाय राजकीय अंदाज यापूर्वीही खोटे ठरले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर अॅटली यांनी केलेला चर्चिलचा पराभव अनपेक्षितच नव्हता का ? मिशीगनचे रिपब्लीकन राज्यपाल टामनी यांनी, गेल्या अध्यक्षीय प्राथमिक निवडणुकीत फार जोरदार सुरुवात केली होती, परंतु त्यांचा पुढे काहीच प्रभाव पडला नाही. थोडयाफार फरकाने मस्कींच्या बाबतीतच यावेळी हेच घडले. पैशाचा तुटवडा हे मस्कींच्या पराभवाचे एक कारण देण्यात येते हे तितकेसे बरोबर नाही. कारण मस्कींनी प्रचारासाठी आतापर्यंत ३० लाख डॉलर्स खर्च केले आहेत."

"डेमॉक्रॅटिक पक्षाची यावेळची अवस्था बघता सिनेटर टेडी केनेडी खास लोकाग्रहास्तव म्हणून तरी अध्यक्षीय उमेदवार म्हणून रिंगणात उतरतील का व उतरल्यास त्यांची निवडून येण्याची शक्यता किती आहे ?" मस्कींवरून केनेडींवर गाडी वळवत मी विचारले. डीन रस्क म्हणाले, "केनेडी उमेदवार म्हणून उभे राहतील की नाही हे मी काहीच सांगू शकत नाही. कारण तो सर्वस्वी त्यांचा प्रश्न आहे. पण एक गोष्ट खरी की राजकीय नेत्यांची एखादी गंभीर चूक अमेरिकन मतदारांच्या मनात बराच काळ राहते, चाप्पाक्विडीक प्रकरण अजून लोक विसरू शकले नाहीत. टेडींना देशाच्या काही भागात जोरदार पाठिंबा मिळेल, परंतु

दक्षिणेत त्यांचा काहीच प्रभाव पडणार नाही. शिवाय त्यांच्या दोन भावांच्या राजकीय हत्येच्या पार्श्वभूमीवर केनेडी कुटुंबाची टेडीने इतक्या लवकर अध्यक्षीय रिंगणात उतरू नये अशी इच्छा आहे."

## दक्षिणेत पाठिंबा नाही

सिनेटर मस्कींच्या पराभवाने जसे लोक आश्चर्यचकित झाले तसेच सिनेटर मॅकगव्हर्नच्या विजयाने लोक चकित झाले. त्याबद्दल आपले विचार व्यक्त करताना डीन म्हणाले, – "सिनेटर मॅकगव्हर्न अथवा राज्यपाल जॉर्ज वॅलेस काही विशिष्ट प्रश्नाचे भांडवल करून मते मिळवतात. त्यांची धोरणे परस्परभिन्न असली तरी त्या त्या विचाराच्या लोकांचा त्यांना जोरदार पाठिंबा मिळतो. मॅकगव्हर्ननी व्हिएतनाम युद्धविरोधी भूमिका घेतली तर जॉर्ज वॅलिसनें सक्तीच्या काळयागोऱ्यांच्या एकत्र शालेय शिक्षणासंबंधी. केनेडींप्रमाणेच देशाच्या काही विशिष्ट भागात मॅकगव्हर्न यांन पाठिंबा मिळेल पण दक्षिणेत ते निष्प्रभ ठरतील. सिनेटर केनेडींनी मॅकगव्हर्नना पाठिंबा देऊनही या परिस्थितीतविशेष फरक पडणार नाही, कारण त्यांचे पाठीराखे एकाच मतप्रणालीचे आहेत. त्यामुळे केनेडी मॅकगव्हर्न अशी युती जरी झाली तरी हम्फ्रींचे विशेष नुकसान होणार नाही. परंतु जर केनेडीच उमेदवार म्हणून उभे राहिले असते तर मात्र मॅकगव्हर्न यांची बरीचशी मते विभागली गेली असती. पण सध्या लोकांचा कल विचारात घेता सिनेटर हम्फ्रींचे ग्रह चांगले दिसताहेत. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या मेळाव्यापर्यंत कोठल्याही उमेदवाराला पुरेसे प्रतिनिधी मिळाले नाहीत तर त्यांना सर्वमान्य उमेदवार निवडावे लागतील. अन् अशा परिस्थितीत इलिनॉईसचे सिनेटर स्टीव्हनसन व कॅलिफोर्नियाचे सिनेटर जॉन टनी अशी अनपेक्षित जोडी डेमॉक्रॅटिक पक्षातर्फे अध्यक्षीय व उपाध्यक्षीय निवडणूक लढवताना दिसेल."

न्यूयॉर्क शहराचे महापौर जॉन लिंडसे हे अध्यक्षीय उमेदवार म्हणून निवडून येणार नाहीत याची जरी लोकांना खात्री होती तरी ते इतके निष्प्रभ ठरतील हे अपेक्षित नव्हते. पहिल्या दोन राज्यातील निवडणुकांनी लिंडसे-पाठीराख्यांची घोर निराशा केली. जॉन लिंडसेंच्या राजकीय भवितव्याविषयी मी विचारता प्राध्यापकमहाशय म्हणाले; "जॉन लिंडसे काँग्रेसमन असताना त्यांनी एक तळमळीचा कार्यकर्ता म्हणून लौकिक मिळवला होता. ते उच्च मध्यम वर्गातून पुढे आले व त्या वर्गातील लोकांचा त्यांना पाठिंबा होता. काही दिवसापूर्वी मी न्यूयॉर्कला गेलो होतो. तेथे सर्वसामान्य लोकांशी बोलतानाही मला जॉनचा प्रभाव ओसरत चालल्याचे जाणवले. संबंध देशात काय पण न्यूयॉर्कमध्येही जॉन निवडून येणार नाही असे मला वाटले. जॉनच्या राजकीय भवितव्यासंबंधी सांगावयाचे म्हणजे जॉन कदाचित एखाद्या खात्याचा सेक्रेटरी म्हणून नेमला जाण्याची शक्यता आहे."

गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत तिसऱ्या पक्षाचे उमेदवार व दक्षिणेचे प्रतिनिधी म्हणून गाजलेले आणि दक्षिणेतील सहा राज्यात विजय मिळवलेले अलाबामाचे

राज्यपाल जॉर्जवॉलेस हे प्राथमिक निवडणुकीत कितीही यश मिळवत असले, तरी ते डेमॉक्रॅटिक पक्षाचे उमेदवार म्हणून निवडले जाण्याची अजिबात शक्यता नाही, असे डीननी छातीठोकपणे सांगितले. ते पुढे म्हणाले,– "शासनाच्या एखाद्या धोरणावर टीका करून लोकांची मते वॉलेस मिळवतात. परंतु लोकमत लक्षात घेऊन व आक्षेपार्ह धोरणात फेरफार करून निक्सन वॉलेसच्या टीकेतील हवाच काढून घेतात. वॉलेस उपाध्यक्षीय उमेदवार म्हणूनही निवडणूक लढवण्याची शक्यता मला वाटत नाही. दक्षिणेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जॉर्जना आज उत्तरेत चांगली मते मिळताहेत, कारण आजकाल उत्तरेतच वर्णभेद जास्त बळावत चालला आहे. दक्षिणेत पिढ्यान्‌पिढ्या एकत्र राहिल्याने काळ्या–गोऱ्यांनी एकमेकांचे अस्तित्व मान्य केले आहे, ते एकमेकांच्या अंगवळणी पडले आहे. परंतु उत्तरेत भिन्न वर्णाच्या लोकांना अजून एकमेकांचा तितकासा सराव झालेला नाही."

## निक्सन यांची वाढलेली लोकप्रियता

अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्या परत निवडून येण्याच्या शक्यतेबाबत बोलताना डीन रस्क म्हणाले,–"आजपासून तो नोव्हेंबरपर्यंत घडणाऱ्या घटनावर ते अवलंबून आहे, तरी निक्सन पुन्हा निवडून येण्याची ६० टक्के खात्री वाटते. आय. टी. टी. सारखी प्रकरणे निक्सन यांची काही मते खातील, परंतु त्याचा निक्सनच्या विजयावर फारसा परिणाम होणार नाही. निक्सन यांनी गेल्या एक वर्षात बरीचशी महत्त्वाची पावले उचलली व ती लोकमान्यही झाली. निक्सननी सध्या व्हिएतनाममध्ये अधिक प्रमाणात बॉंबहल्ले सुरू केल्यावरही त्यांची लोकप्रियता ओसरली नाही, उलट वाढीसच लागली आहे."

अध्यक्षीय प्राथमिक निवडणुकीत निक्सन यांना विरोध करणाऱ्या रिपब्लिकन पक्षाचे कॉंग्रेसमन पॉल मॅक्लॉस्की व जॉन ॲडब्रुक यांचेबद्दल बोलताना डीन म्हणाले, "त्यांचा विरोध अगदीच दुबळा आहे हे त्यांना मिळणाऱ्या मतावरून दिसून येतेच. कॉंग्रेसमन म्हणून फक्त ४–५ लाखाच्या मतदारसंघातून ते निवडून आलेले आहेत. पुढील निवडणूक निक्सन लढवू शकत नाहीत तेव्हा आपली उमेदवार म्हणून वर्णी लागावी हाच त्यांच्या सध्याच्या उमेदवारीचा हेतू असण्याची शक्यता आहे."

आम्ही विएतनाममधून काढता पाय घेत आहोत, असे निक्सन यांनी चीनला सांगितल्यामुळे त्याचा युद्धावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे, असे डीनना वाटते. उत्तर विएतनामच्या दक्षिण विएतनामवरील सध्याच्या हल्ल्यामागे रशिया नसून चीनची चिथावणी असण्याचाही संभव आहे किंवा चीन व रशियावर अवलंबून न राहता हनोई आपले स्वतःचे असे स्वतंत्र धोरण आखण्याचीही शक्यता आहे. अन् तसे असले तर मग वाटाघाटींनी हा प्रश्न सोडवणे अधिकच किचकट बनेल. निवडणुकीच्या दृष्टीने विएतनाम युद्ध हा आजही एक महत्त्वाचा विषय आहे. आजच्या सर्वसाधारण अमेरिकन व्यक्तीची प्रवृत्ती जागतिक प्रश्नात प्रत्यक्ष

कार्रवाई करण्याबावत उदासीन बनत चालली असून अमेरिकेतील अंतर्गत प्रश्न चांगल्या रीतीने सोडविले जावेत, अशा प्रकारची आहे.

चीन भेटीने अध्यक्ष निक्सन यांना कमालीची लोकप्रियता मिळवून दिली असली तरीही तो एक राजकीय स्टंट होता असे डीन रस्कना वाटत नाही. प्रत्येक अमेरिकन अध्यक्षाला आपल्या तीन वर्षांच्या कारकीर्दीत कमीत कमी चाळीस देशांच्या नेत्यांना त्यांच्या देशात भेटावयास जावे लागते अथवा अमेरिकेत त्यांचे स्वागत करावे लागते. गेल्या दशकात अमेरिकेने निरनिराळ्या निमित्ताने रशियाच्याजवळ जाण्याचा प्रयत्न केला तसा या दशकात चीनजवळ जाण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता आहे. निक्सन राजवटीपूर्वी संभाषणाभावी अमेरिका-चीन दुरावत चालले होते असे नाही. कारण की, दोन्ही देशांच्या वेगवेगळ्या ठिकाणच्या राजदूतांच्या बऱ्याच भेटी होत होत्या. परंतु प्रत्येक वेळी थायवान आम्हाला द्या हाच चीनचा हेका असे. आता थायवान चीनला देण्यास ते काही आमचे नव्हते. त्यामुळे वाटाघाटीतून कधीच काही निष्पन्न होत नसे. जोपर्यंत माओ-त्से-तुंग राज्यावर आहे तोपर्यंत स्वतःहून चीनचा भाग बनण्यास थायवान कधीच तयार होणार नाही. राष्ट्रसंघातून थायवानची झालेली हाकलपट्टी व चीनभेटीत निक्सन यांनी एक चीनला दिलेल्या अप्रत्यक्ष मान्यतेच्या पार्श्वभमीवर, चीनने थायवानवर जर आक्रमण केले व अमेरिकेने हस्तक्षेप केला नाही तर भविष्यात थायवान चीनचा भाग बनून जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

निक्सन यांच्या चीन भेटीच्या पहिल्या दिवशी विमानतळावर त्यांचे स्वागत करण्यास चिनी जनता हजर नव्हती, याबद्दल अमेरिकेत तीव्र प्रतिक्रिया उमटली. त्या संबंधाने डीनना स्वतःची रशिया भेट आठवली. अण्वस्त्रांबावत एका करारावर


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

स्वाक्षरी करण्यास डीन जेव्हा रशियात गेले होते तेव्हाही त्यांचे असेच थंडे स्वागत करण्यात आले. परंतु त्यानंतर बड्या नेत्यांची भेट झाली, करारावर सह्या झाल्या, अन् लगेच अमेरिकन नेत्यांच्या स्वागतासाठी गर्दी झाली. थोडक्यात म्हणजे अशा गोष्टी बड्या नेत्यांच्या इच्छेवर अवलंबून असतात.

## किसींजर - एक ऑब्जेक्ट

राष्ट्राध्यक्षांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डॉ. हेन्री किसींजरचा विषय काढताच मुद्रेवर मिस्किल हास्य खेळवत डीन म्हणाले, "दूरचित्रवाणी वा वर्तमानपत्रांना राजकीय वर्तुळातील एखादी महत्त्वाची व्यक्ती "ऑब्जेक्ट' म्हणून हवी असते. गुप्त दौरे काढणारा, सुंदर तरुण मुलींबरोबर डेटस् घेणारा, आजूबाजूला हॉलिवूड चित्रतारकांना वावरू देणारा, जर्मन पद्धतीने अमेरिकन बोलणारा हेन्री 'ऑब्जेक्ट' म्हणून निवडला गेला आहे. मी जेव्हा दौऱ्यावर जातो तेव्हा हेन्री किसींजरचे वॉशिंग्टनमध्ये नक्की कोणते स्थान आहे, हा प्रश्न मला विचारण्यात येतो. यापूर्वी किसींजरच्या स्थानावर जी मंडळी होती त्यांना इतके महत्त्व नव्हते, ही गोष्ट खरी आहे. पण चीनबाबतचे धोरण ठरवताना जितके महत्त्व हेन्रींना आहे तितकेच महत्व मध्यपूर्व आशियाबाबत धोरण आखताना जोसेफ सिसको यांना आहे. किसींजर यांना मिळणाऱ्या वाढत्या महत्त्वामुळे उपाध्यक्ष अॅग्नू वा सेक्रेटरी ऑफ स्टेट विल रॉजर्स यांचे महत्त्व कमी होते, असे मला वाटत नाही, कारण अमेरिकेत उपाध्यक्षाला फार मोजके हक्क असतात अन् शासनाच्या ठराविक धोरणावरच किसींजर आपली छाप उमटवू शकतात. त्यामुळे किसींजर हे उपाध्यक्षीय उमेदवार आहेत वा निक्सन मंत्रिमंडळात क्रमांक दोनवर आहेत, वगैरे गोष्टीत काहीच तथ्य नाही. कदाचित नवीन मंत्रिमंडळात किसींजर हे सेक्रेटरी ऑफ स्टेट होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे टेक्सासमध्ये बहुमत मिळवण्यासाठी निक्सन सेक्रेटरी ऑफ ट्रेजरी जॉन कॉनली यांना उपाध्यक्षीय उमेदवार ठरवून निवडणूक लढवतील असेही मला वाटत नाही. कारण टेक्सास राज्यपाल स्मिथ यांच्या विरोधातूनही निक्सनना टेक्सासमध्ये बहुमत मिळेल. कारण या देशात लोक पक्षाला मते न देता उमेदवाराला देतात."

काही महिन्यापूर्वी अमेरिकन डॉलर घसरला. वादळ सध्या जरी शमले असले तरीही डॉलरला बसलेला धक्का अमेरिकन जनतेलाही धक्का देऊन गेला. प्राध्यापक रस्क यांच्या मते अवमूल्यनाची जरुरी होती व जॉन कॉनली आणि निक्सन यांनी डॉलर स्थिर करण्याबाबत चांगली कामगिरी बजावली. सध्याच्या सूचक परिस्थितीवरून डॉलरला नजिकच्या भविष्यकाळात काही गंभीर धोका आहे असे डीनना वाटत नाही.

मुलाखत रंगत होती, मध्येच डीनना वाईनची तल्लफ आली. ग्लास भरले गेले अन् संभाषणाचा ओघ मी भारत–पाक वादाकडे वळवला.

राष्ट्राध्यक्ष निक्सननी भारत–पाक वादात भारतविरोधी भूमिका घेतल्याने बऱ्याच अमेरिकन बुद्धीमतांनी त्यांच्यावर टीकेचा भडिमार केला. या टीकेचा निक्सन यांच्या निवडणुकीवर कितपत परिणाम होण्याची शक्यता आहे, असे मी विचारता डीन म्हणाले, " अमेरिकन बुद्धीमंताकडे फक्त त्यांची स्वतःची मते आहेत. त्यांच्या टीकेचा लोकांच्या मनावर विशेष परिणाम होणार नाही. ६० साली निवडणुकीच्या वेळी जॉन केनेडी हे हॉरवर्डमधील बुद्धीमंतापासून दूर राहिले होते. शिवाय अमेरिकन जनता भारत–पाक वादाला जास्त महत्त्व देण्यास तयार नाही. या वादाकडे ती अलिप्ततेने पाहते. अमेरिकन शासन जरी आमच्या विरोधी असले तरीही अमेरिकन जनता आमच्या बाजूने उभी आहे, असा जो एक सार्वत्रिक समज भारतात प्रचलित आहे त्याबाबत मी फारसे काही बोलू शकत नाही. पण तमाम अमेरिकन जनता श्रीमती गांधींच्या बाजूने उभी राहील असे काही मला वाटत नाही."

भारत–पाक वादाबद्दल सर्वसाधारणपणे बोलताना डीन रस्क म्हणाले, "भारत वा पाक यापैकी कोणाच्याही बाजूने मी तासन् तास बोलू शकेन. परंतु जागतिक प्रश्नातून अमेरिका अंग काढून घेत असताना तसे करण्याची मला इच्छा नाही. गेल्या दशकातील माझा अनुभव म्हणजे, आम्ही दिल्लीला एखादी गोष्ट सुचवली की दिल्ली आम्हाला कराचीला ही गोष्ट समजावून सांगा असे सांगणार आणि कराचीला एखादी गोष्ट सुचवली की ते आम्हाला दिल्लीकडे पाठवणार. तुमची भांडणे, लढाया चालूच राहाणार. असे असताना आम्ही दोघांनाही मदत थांबवली, कारण तुम्ही आमचा पैसा एकमेकांशी भांडणात फुकट घालवू लागलात."

" बांगला देशाची निर्मिती ही एक सत्य घटना आहे व ती प्रत्येकाला कधी ना कधी मान्य करावीच लागेल. सध्याच्या परिस्थितीनुसार भारत–पाकमध्ये पुढील दहा वर्षेतरी अमेरिका काहीच करणार नाही. तेव्हा भारताने अमेरिकेला पुढील दहा वर्षे चक्क विसरून जावे व स्वतःची उन्नती करण्याचा प्रयत्न करावा. Just forget about U. S. and work on yourself."

" बांगला देशाच्या निर्मितीमुळे पश्चिम बंगाल व बांगला देश यांचे एकत्र राष्ट्र बनण्याचा किती संभव आहे ? कारण की पश्चिम बंगाल व दिल्लीतील केंद्र सरकारचे संबंध कधीच चांगले नव्हते."–आता प्रश्न विचारण्याची पाळी प्राध्यापकांची होती.

एकत्र बंगाल राष्ट्र बनवण्याचा संभव अजिबात नाही, आम्ही आत्मविश्वासाने सांगितले. बांगला देश व पश्चिम बंगाल दोघानाही ते कदापि मान्य होणार नाही. शिवाय केंद्रांचे व पश्चिम बंगालचे संबंध सध्या सुधारत चालले आहेत. नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत श्रीमती गांधींच्या पक्षाने बंगालध्ये भरघोस यश मिळवले.

अमेरिका भारताला नाना प्रकारची मदत देऊन भारताच्या अंतर्गत धोरणात हस्तक्षेप करू पाहते का ? मी परत प्रश्न विचारण्यास सुरवात केली.

भारताच्या बाबतीत परकीयांनी भारतीय धोरणात हस्तक्षेप करण्याचा प्रश्नच येत नाही. आजपर्यंत आपल्याला जे हवे ते भारत करत आला आहे. तुम्हाला हैद्राबाद निजामाच्या इच्छेविरुद्ध विलीन करावयाचे होते. तुम्ही करून टाकले. हाच नियम जेव्हा पाकिस्तानने काश्मीरमध्ये लागू करावयाचा प्रयत्न केला तेव्हा तुम्ही राष्ट्रसंघाची विनंती धुडकावून काश्मीरमध्ये सैन्य घुसवलेत. ज्यावेळेस कृष्णमेनन आमच्यावर तोंडसुख घेत होते, त्यावेळेस गोव्यातील जनतेचा विचार न करता त्यांचे सैन्य गोव्याचा ताबा मिळवत होते. आता तुम्हाला बांगला देश निर्माण करावयाचा होता, लष्करी प्रयत्नांनी तुम्ही आपले इप्सित साध्य केले. आणि अशा प्रत्येक वेळी नेहरू व त्यांची कन्या यांनी आमच्या धोरणावर टीका करून शांततेवर भाषणे झोडली. आम्ही तुम्हाला कितीही मदत केली असली, तरीही जेव्हा जेव्हा आम्ही आणि रशिया राष्ट्रसंघात विरुद्ध बाजूस होतो तेव्हा बहुतेक वेळी तुम्ही रशियाला पाठिंबा दिलात.

प्राध्यापकांना भारताची बाजू वरील प्रसंगांच्या निमित्ताने सांगण्याचा मी जेव्हा प्रयत्न केला तेव्हा त्यांनी माझे म्हणणे दोन मिनिटे शांतपणे ऐकून घेतले व नंतर स्मित हास्य करीत ते म्हणाले, ' बस बस, हे सर्व मी पूर्वी नेहरूंच्या तोंडून बऱ्याच वेळा ऐकले आहे ! '

भारताची सध्याची अन्नधान्य परिस्थिती कशी आहे ? विषय बदलीत डीननीच आम्हाला प्रश्न टाकला.

" फारच उत्तेजनकारक आहे. तुमचा कदाचित विश्वास बसणार नाही, पण भारताने हिरव्या क्रांतीत भरघोस यश मिळवले असून लवकरच भारत अन्ननिर्यात सुरू करेल. " आम्ही मोठ्या अभिमानाने सांगितले.

" माजी राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांनी लिहीलेल्या पुस्तकात भारताला अन्नधान्य मदत देण्याबाबत त्यांच्यात व माझ्यात मतभेद असल्याचे नमूद केले आहे ' डीन बोलू लागले, " भारताने जेव्हा आमच्याकडे अन्नमदत मागितली तेव्हा शक्य होती तेवढी अन्नमदत आम्ही केली. परंतु काहीवेळा भारताची अन्नाची मागणी इतक्या मोठ्या प्रमाणावर होती व आमच्याकडे तितके अन्न शिल्लक नव्हते. तेव्हा जॉन्सन राजवटीत आम्ही ठरवले की, भारताला नुसतीच अन्नाची मदत देण्यापेक्षा रासायनिक खते, तांत्रिक पद्धतीची लागवड, नवीन शेतीविषयक उपकरण वगैरेचे सहाय्य करून स्वावलंबी बनवले पाहिजे. कारण आमच्या अहवालानुसार चालू पद्धतीत काही फेरफार घडवून भारत आपले अन्नोत्पादन कमीत कमी तिपटीने वाढवू शकत होता. तुमचे सुब्रह्मण्यम् हे फार कार्यक्षम मंत्री होते व त्यांनी आम्हाला चांगले सहकार्य दिले."


ही पहा
कपडे धुण्यासाठीं
डिटर्जंट शक्तिशाली वडी
कपडे कितीहि धोळले तरी स्वच्छ निघतच नाहीत मुळी. मला वाटतं, या पाण्यामुळें होत असावं असं.
अग, पण मी याच पाण्याने धुते ना कपडे ! मग माझे कपडे कसे स्वच्छ निघतात? हां, पण मी साबण मात्र वापरीत नाही.
असं ! मग वापरतेस तरी काय तू !
आता मिळू लागलेली डेट डिटर्जंट वडी.
काय असतं तीत एवढं !
तिच्यात असते डिटर्जंट शक्ति. तिनं फेस तर चांगला येतोच पण शिवाय साबणापेक्षा ती कितीतरी प्रभावी असते. तिनं कपडे स्वच्छ नि उजळ निघतात. नीळ किंवा इतर काही वापरण्याची आवश्यकता नसते.
अगदी खरं ! डेट डिटर्जंट वडीने साबणापेक्षा दीडपट कपडे धुतले जातात. त्यामुळे तिचा वापर करणं खूप काटकसरीचं होतं !
NEW! det
डेट डिटर्जंट वडी
५०% कपडे अधिक धुणारी
अन् तेही साबणापेक्षा अधिक शुभ्र.
पाणी कसेहि असो–अगदीं क्षारयुक्त असलें तरी !

काही दिवसापूर्वी भारतीय विद्यार्थांच्या दृष्टीने सनसनाटी ठरणारी एक बातमी वर्तमानपत्रात छापून आली होती. स्थानिक लोकांच्या विनंतीनुसार डेट्रॉईट, मिशीगनमध्ये परवानाविना नोकरी करणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांवर धाड घालण्यात आली. अर्थात जोरदार फटका बसला तो भारतीयांना, कारण त्यांची संख्या इतर कोणत्याही देशाच्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी पटीने जास्त होती. यापैकी बऱ्याच विद्यार्थ्यांना भारतात परत पाठवण्यात आले. या बातमीने भारतीयात खळबळ उडवून दिली होती. परदेशी विद्यार्थ्यांच्या अमेरिकेतील परिस्थितीबाबत मी विषय काढला असता प्राध्यापक म्हणाले, "परदेशी विद्यार्थी हे त्यांच्या देशात त्यांना ज्या प्रकारचे शिक्षण मिळू शकणार नाही त्या प्रकारचे शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेत येतात. शिक्षण हाच त्यांचा हेतू असला पाहिजे. अमेरिकन नागरिकत्व मिळवणे हा नाही. किंबहुना अमेरिकेत घेतलेल्या शिक्षणाचा त्यांनी आपल्या देशासाठी उपयोग केला पाहिजे. मी जेव्हा रॉकेफेलर फाऊंडेशनमध्ये होतो, तेव्हा परदेशी विद्यार्थ्यांना आर्थीक सहाय्य देऊन अमेरिकेत आणताना आम्ही फार काळजीपूर्वक निवड करत होतो. आम्ही आर्थीक सहाय्य दिलेल्या हजार विद्यार्थ्यांपैकी एखादा अमेरिकेत स्थाईक होत असे. वास्तविक पहाता अमेरिकेत परदेशी विद्यार्थ्यांवर फार सैल निर्बंध घालण्यात आले आहेत. या देशात विद्यार्थ्यांना फक्त वर्षातून एकदा आपला ठावठिकाणा कळवावा लागतो. कित्येक देशात दर महिन्याला तपासणी होते. मी स्वत: इंग्लंडमध्ये शिक्षण घेत होतो तेव्हा मला नोकरी करता आली नाही. परदेशी लोकांनी नोकऱ्या अडवल्यामुळे जर स्थानिक लोक बेकार रहाणार असतील, तर डेट्राईटसारखी कृती अपरिहार्य ठरेल.

"आता शेवटचा प्रश्न "मनगटावरील घड्याळाकडे पहात मी म्हणालो, "जर डेमॉक्रॅटस् निवडून आले तर परत एखाद्या महत्वाच्या पदाची जबाबदारी आपण अंगावर घ्याल का ?"

उत्तरादाखल मोठ्याने हसून डीन रस्क म्हणाले, "मी राजकारणातून कायमचा निवृत्त झालो आहे. गेली वीस वर्षे मी काही ना काही करत होतो व माझा वाटा मी उचलला आहे असे मला वाटते. जर उद्या तशीच वेळ आली तर, I would rather be a dog-Catcher in Athens.

अटलांटाला परत जाण्यासाठी मी गाडी वळवळी तेव्हा माजी भारतीय राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांचे एक वाक्य मला आठवले. 'नटनटी व राजकारणातील नेते यांना निवृत्त कधी व्हावे हेच कळत नाही.' केनेडी-जॉन्सन कारकिर्दीतले सेक्रेटरी ऑफ स्टेट डीन रस्क यांना मात्र ते बरोबर उमगले होते.

□ □ □

# शतपावली

## एका प्रेमप्रकरणाची शताब्दी

**रवींद्र पिंगे**

माणसं ढगांसारखी असतात. ढगांचे रंग बदलतात. आकार बदलतात. वहावत जाण्याच्या दिशा बदलतात. स्तर बदलतात. कालचे ढग आज नसतात. आजचे ढग उद्या नसतात. उद्याचे परवा नसतील. त्या त्या वेळी ढगांचा जो काही आकार नि रंगाविष्कार सृष्टीत तयार झाला असेल, तोच तेवढ्यापुरता खरा समजायचं. माणसांचंही तसंच असतं. माणसं तीच. पण ती एकसारखी बदलत असतात. बाहेरूनही बदलतात नि अंतर्यामीही पालटतात. कालची माणसं आज नसतात. आजची उद्या, परवा नसतील. ढगांप्रमाणेच माणसांच्या कर्तृत्वाचेही आकार बदलत असतात. वृत्तीचे रंगढंग तर हमेशा बदलत असतात. कालचा माणूस आज नसतो. त्याचा जीवनौघ सतत पात्रपालट करीत असतो. पाणी पालटण्याची क्रिया माणसांच्या आयुष्यात सतत चालू असते. ढगांसारखेच त्यांचे स्तरही बदलत असतात. आज जो माणूस वर असतो तो उद्या खाली सरकणारच नाही असं नाही. एकमेकांवर आदळत, आपटत, एकमेकात गुंतत, एकमेकांना झांकत, साखळीपासून सुटत, परत जोडत, परत सुटत, भरकटत, थांबत, धावत माणसं यदृच्छेने लाभलेल्या दिशेने ढगांसारखी वहातच असतात. माणसं ढगांसारखी घनगंभीर असतात. अंधारलेली असतात. चंचल असतात. आणि ढगांसारखी प्रकाशणारीही असतात. मात्र, काही माणसं ढगांसारखी नसतात.

काही माणसं असतात डोंगरमाथ्यावरल्या कोसळलेल्या किल्ल्यासारखी. ती भग्न पण भक्कम असतात. पायात मजबूत असतात. ऊन, वारा, पाणी, सारं काही सोशीत असतात. चांदण्याचा त्यांना उत्कट अनुभव असतो आणि त्यांच्या मागेमागे इतिहास-भूगोल असतो. काळाच्या पडद्याआड गेली तरी अनेकांचं चित्त त्यांनी आपल्याकडे बळेच ओढून घेतलेलं असतं. सारखी त्यांची आठवण ह्या नाही त्या कारणाने मागच्यांना येत असते. अंगठीत हिरे असतात, तसे ते चित्तात स्थिरावतात. धर्मचक्रप्रवर्तक, शककर्ते, बाहुबली, द्रष्टे, दर्शनकार, सांख्य, वर्मेंची गणना

यांच्यातच आहे. मात्र, एवढ्यावरच हे क्षेत्र सीमित होत नाही. चोरट्या प्रेमात पडून अकाळविकाळ प्राक्तनाचे भक्ष्य झालेल्या शापित बहाद्दरांची गणनासुद्धा ह्याच गोमट्या गटात केलेली बरी. प्रेम लाभणं ही दैवी कृपेची बाब आहे. त्यातूनही मनपसंत व्यक्तिचंच प्रेम लाभणं हा तर शुद्ध नियतीच्या अनुग्रहाचाच भाग. अनिच्छया प्रेम करावं लागणं हा शाप आहे. आणि चोरटं प्रेम करणं हा गुन्हा नाही. चोरटं प्रेम भोगल्याची बतावणी करणं, हे स्खलन आहे. तो हताशपणं स्वताविरुद्ध केलेला क्षुल्लक कट आहे. मंत्र-तंत्र, जप-जाप्य, पोथी-पुराण करून वात्सल्य लाभेल ? कदापिही लाभणार नाही. का ? कारण वात्सल्य हा पान्हा आहे. तो देवदयेनेच फुटावा लागतो. त्याचा लाभ आणि पुनर्लाभ ललाटीच लिहिलेला असावा लागतो. चोरट्या प्रेमाचंही तसंच आहे. देवाच्या ह्या अफाट दुनियेत ते सुद्धा ललाटीच असावं लागतं

चार्लस डिल्केच्या ललाटी ते लिहिलेलं होतं.

शंभर वर्षापूर्वीचा हा माणूस आहे. बरोबर शंभर वर्षापूर्वी एकोणतीसाव्या वर्षी ह्या रावसाहेबांचं रितीप्रमाणे लग्न झालं. ह्याची थोरवी ती नाही. ऐन तारुण्यातच तडफ, चातुर्य, निष्ठा आणि अविरत कष्ट ह्यांच्या बळावर तो ब्रिटीश पार्लमेंटमध्ये उदारमतवादी पक्षाचा इच्छुक म्हणून निवडून आला. वयाच्या अवघ्या एकूणचाळीसाव्या वर्षी तो ब्रिटिश मंत्रिमंडळातला कॅबिनेट दर्जाचा मंत्री झाला. त्याच्या अगोदर दोन वर्ष त्याने परराष्ट्र विभागातही सचिव म्हणून काम पाहिले होते. त्याची तडफ पाहून डिझरायलीने होरा वर्तविला होता की हा खासदार चार्लस डिल्के अगदी नजिकच्या काळात ब्रिटनचा पंतप्रधान होईल. ग्लॅडस्टनलाही तसं वाटलं होतं. आणि त्यात काय गैर होतं ? चाळीशीच्या आत जो अक्कलहुशारीने मंत्रीपद भूषविता झाला, त्याला पंतप्रधानाची वस्त्रं अशी कितीशी दूर होती ?

दूर नव्हती. पण एक बारकीशी गोम होती. डिल्के स्त्री-सुखाबाबत वाजवीपेक्षा अधिक आसक्त आणि बेसावधही होता. आणि नेमकी स्त्रीच त्याच्या भाळीचा भाग्यश्रीचा कुंकुमतिलक पुसायला आडवी आली.

त्यावेळी स्मिथ नावाच्या घराण्याकडे जहाज बांधणीचा धंदा होता. त्यांच्या गोद्याही होत्या. केवळ नौकानयनावरच स्मिथ घराण्याच्या बाहुबलीचे उत्पन्न त्या स्वस्ताईच्या सुवर्णयुगात सालीना सात आठ लाखाच्या घरात होतं. स्मिथसाहेबांना संसारसुखही वरवर पाहता विपुल लाभलं असावं, कारण त्यांना दहा मुलं झाली. पैकी सहा लावण्यवती कन्यका होत्या, तर चार गुटगुटीत मुलगे होते. पैसा, मान-मरातब, संतति साऱ्याच बाजूने स्मिथसाहेबांची चंगळ होती. मात्र इतकं असूनही स्मिथसाहेबांच्या गृहलक्ष्मीचा जीव ह्या डिल्केत गुंतलेला होता. अनायासे डिल्के त्यावेळी पंचविशीतला ब्रह्मचारी होता. सौ. स्मिथ चाणाक्ष असल्यामुळे ती घट-

स्फोटाच्या भानगडीत पडली नाही. ती फक्त डिल्केजवळ कंपॅनियन म्हणून राहिली.

डिल्के आणि लेडी स्मिथ ह्यांचा हा मधुर भक्तियोग फक्त वर्षभर टिकला. ह्या एका वर्षाच्या काळात स्मिथ दांपत्याच्या थोरल्या मुलीला त्याने आपला एकुलता एक धाकटा भाऊ ॲस्टन ह्याची वधु म्हणून आपल्या घरात आणली. म्हणजेच, प्रेयसीची थोरली लेक ही डिल्केची धाकटी वहिनी झाली.

डिल्केचं आणि लेडी स्मिथचं कशामुळे फिसकटलं कळत नाही. पण लेडी स्वतःच्या धनवान नवऱ्याकडे निघून गेली आणि डिल्के अन्य कुमारीकेशी रितसर बाशिंग बांधायला मोकळा झाला. त्याप्रमाणे तीन वर्ष अशीतशी काढून एकूणतिसाव्या वर्षी डिल्केने लग्न केलं. त्याचा गृहस्थाश्रम फक्त दोन वर्षंच काय तो टिकला. अवघ्या एकतीसाव्या वर्षी डिल्केवर विधुरावस्थेचा दारुण प्रसंग लोटला. ऐन तारुण्यातच डिल्के एकाकी झाला.

विधुरावस्था नशिबी आलेल्या डिल्केच्या पोळलेल्या हृदयावर प्रेमाने फुंकर घालायला म्हणून लेडी स्मिथ पुन्हा उगवली ! नियतीने पुन्हा फासे टाकले. पुन्हा डिल्के आणि स्मिथबाई यांची कंपॅनियनशिप सुरू झाली. पुन्हा ती वर्षभरच टिकली. डिल्केचं आणि लेडी स्मिथचं ह्या दुसरेपणाच्या पर्वात कशामुळे फिसकटलं कळत नाही. पण झाल्यागेल्या गोष्टींवर पडदा टाकून स्मिथसाहेबांची बायको आपल्या श्रीमंत नवऱ्याकडे निघून गेली. डिल्के राजकारणाची गुढी उभारायला मोकळा झाला. त्याने आपली ती आघाडी नीट सांभाळली.

ह्याच वेळी स्मिथमंडळींची तिसऱ्या क्रमांकाची सौंदर्यवती मुलगी व्हर्जिनिया हिचं क्रॉफर्ड नावाच्या राणीच्या एका वयस्क सल्लागाराशी रीतसर लग्न झालं. क्रॉफर्ड कुटुंब उत्तर इंग्लंडमध्ये रहायचं. आपल्या आईचा कौटुंबिक मित्र ह्या नात्याने डिल्केची आणि व्हर्जिनियाचा स्नेहसंबंध जुळून आलेला होताच. त्यामुळे ह्या नवपरिणीत क्रॉफर्ड कुटुंबात डिल्के आपलेपणाने मिसळून वागत होता. डिल्केची ताजीतवानी जीवनदृष्टी, चैतन्यदायी स्वभाव, विनोदी बोलणं आणि वरीष्ठ वर्तुळातली उठबस, ह्यांची त्या रूपवान व्हर्जिनियावर एवढी अमोघ छाप बसली की एकपदरी जीवन जगणारा आपला नवरा तिला अपेक्षेप्रमाणे आळणी वाटायला लागला. डिल्केवर तिचा जीव जडला. लोकसभेच्या कामकाजानिमित्त डिल्केची वसती लंडनलाच असे. तेव्हा डिल्केचा डोंगरवाऱ्यासारखा आल्हाददायक सहवास अधिक मोकळेपणाने मनःपूर्त लाभावा आणि कर्तृत्ववान पुरुषाच्या सावलीत वावरण्यातल्या धन्य क्षणांचा पुन्हा पुन्हा पुनर्लाभ व्हावा म्हणून ती नवऱ्याची समजूत घालून एकटीच लंडनला राहायला आली.

खासदार खुषाल झाले.

तिकडे उत्तर इंग्लंडात क्रॉफर्डसाहेबांची झोप उडाली. त्यांच्यावर निनावी पत्रांचा पाऊस पडू लागला. हितचिंतकांचा मजकूर एकच असे, ‘महाराज, सावध

असा. तिकडे तो डिल्के तुमच्या बायकोला भ्रष्टवीत आहे. सावधान.' क्रॉफर्डने सुरवातीला मजकूरातल्या स्फुल्लींगांकडे दुर्लक्ष केलं. आपल्या मनाला तो बजवायचा, अरे, विवाहसंस्थेचं पावित्र्य म्हणून काही आहे की नाही? धर्माज्ञेने जी माझी गृहस्वामिनी झाली ती परंपरागत नीतीनियमांचे वंद्य पाश तोडून परपुरुषाशी रत होणे शक्य आहे? कालत्रयीही नाही. लोक गाढव आहेत. दोन मनामधल्या मोकळ्या सुखसंवादाचं रहस्य सामान्यांना काय कळणार? संशयाच्या गांधीलमाशीला क्रॉफर्डने पार हाकलून लावलं. पण निनावी पत्रांचा ओघ वाढला. क्रॉफर्डसाहेबांनी हॅट घातली आणि शहानिशा करून घेण्यासाठी स्वारी स्वत: लंडनला येऊन थडकली. पत्रांचा जुडगा व्हर्जिनियाच्यासमोर ठेवला. तिने अर्थातच कानावर हात ठेवले. त्याने विचारलं,

'अग, तू पतिव्रता आहेस हे मी जाणतो ग, पण एकाच वेळी हे इतके लोक कसं काय वाईटसाईट बोलायला लागले? मुळात जर अग्नी नाही, तर हा धूर आला तरी कसा?'

'मी सांगत्ये बघा, हा कारभार माझ्या आईचाच असला पाहिजे! डिल्केची नि माझी मैत्री तिला खुपत असणार म्हणून तिने हे असं कारस्थान रचून दावा साधलाय.' तिने थंड उत्तर दिले.

क्रॉफर्डने सासूला शिव्या मोजल्या.

तरीही पत्रांचा ओघ चालूच राहीला. तेव्हा सासूवर तडफडलेला त्रस्त क्रॉफर्ड पुन्हा लंडनला आला नि त्याने व्हर्जिनियाला आडवेतिडवे प्रश्न विचारून सत्याचा तळ गाठण्याचा चंग बांधला. सांजसकाळ नवराबायकोच्या बैठका व्हायच्या. पंचनामे व्हायचे. डिल्केशी तू हंसतेस का? त्याला केव्हा भेटतेस? कुठे भेटतेस? किती वेळा भेटतेस? भेटतेसच का? तुम्ही काय बोलता? तुमच्या भेटीत कुणी तिऱ्हाईत असतो का? की, तुम्ही फक्त दोघेच एकांतात भेटता? तो तुला भेटी देतो का? तू त्याला भेटी देतेस का? देत असशील, तर त्या भेटीचं स्वरूप काय असतं? त्याचा फोटो तुझ्यापाशी आहे का? तुझा फोटो त्याच्यापाशी आहे का? तो पत्राचे मायने काय लिहीतो? तू काय लिहितेस? तसंच का लिहितेस?...' माती आणि मसण...पार चक्रावून गेलेल्या क्रॉफर्डच्या प्रश्नांच्या सरबत्तीला व्हर्जिनिया शरण गेली. एक दिवस तिने नवऱ्याला शांतपणे सांगितलं,

'तुझा संशय बरोबर आहे. मी गेली दोन वर्षं डिल्केची कंपॅनियन म्हणून रहाते आहे. आमचं उभयतांचं रहस्य आहे'

आता कानावर हात ठेवण्याची पाळी डिल्केची होती.

क्रॉफर्ड पिसाळला. आपल्या धर्मपत्नीला फूस लावणाऱ्या डिल्केची पाळंमुळं खणून काढण्याची त्याने प्रतिज्ञा घेतली. उग्र स्वरूप धारण केलं. आपली सोज्वळ गृहलक्ष्मी व्हर्जिनिया हिला व्यभिचारकर्म करून भ्रष्टविल्याची फिर्याद त्याने

डिल्केवर गुदरली. डिल्केचा तुडविण्याचा तो राजमार्गच होता.

कोर्टात तारीख लागली. खटला उभा राहिला. वादीप्रतिवादींचे साक्षी--पुरावे झाले नाहीत. उलटतपासण्या झाल्या नाहीत. फक्त वकील तेवढे झुंजले. तीन दिवसांच्या सुनावणीनंतर कोर्टाने उदास निर्णय दिला, 'ह्या प्रकरणात साधार असा प्रबळ पुरावा उपलब्ध नाही. व्हर्जिनिया स्वेच्छेने लंडनला आली. व्यभिचार घडला असेल तर तो व्हर्जिनियाने डिल्केशी स्वेच्छेने केलेला आहे; डिल्केने व्हर्जिनियाशी केलेला नाही. डिल्के दोषी आहे असा पुरावा नाही. स्त्रीचा व्यभिचार हा शिक्षापात्र गुन्हा नसतो. तेव्हा, वादी आणि प्रतिवादी निर्दोष आहेत.'

क्रॉफर्डने कपाळावर हात आपटून घेतला.

डिल्केने गूळ वाटला असेल.

प्रकरण एवढ्यावर मोहोरबंद व्हायला हवं होतं. पण समाजात कायद्याचा कीस काढणारे काही भडक आणि अस्वस्थ तज्ज्ञ असतातच. स्टीड नावाचा असा एक सत्यशोधक ह्या खटल्याच्या वेळी भलताच जागा होता. त्याने ह्या प्रकरणातील सर्व पुराव्याची खाजगी छाननी करून सरकारला कळवलं की प्रस्तुत सुनावणीत काही महत्त्वाचा पुरावा वादी-प्रतिवादींनी कोर्टापासून छपवून ठेवलेला आहे आणि अर्धवट पुराव्याच्याच आधारे कोर्टाने निर्णय देणे हे न्यायतत्त्वाशी विसंगत आहे; एतदर्थ, वरीष्ठ कोर्टाने ह्या खटल्यातील वादी-प्रतिवादींची अमुक अमुक मुद्यांववर फेरसुनावणी करावी.

फेरसुनावणीचे हुकूम सुटले.

खटला वरीष्ठ कोर्टासमोर फेरसुनावणीसाठी उभा राहिला. पुराव्याची नव्याने छाननी सुरू झाली. पहिल्या सुनावणीत फक्त वकील तेवढेच झुंजले होते. पक्षकारांची तेव्हा उलट तपासणी झाली नव्हती. ह्या फेरसुनावणीत वादी-प्रतिवादींची मुक्त उलटतपासणी करण्याचा कोर्टाने हुकूम दिला आणि वकिलांना गप्प बसायला सांगितले. डिल्के कसलेला राजकारणपटू होता. बारा बावड्यांचं पाणी चाखलेला होता. हजरजबाबी होता पण उलटतपासणीत तो नेमका नको तिथे ढेपाळला. आपण अनेक बायकांशी चोरटे संबंध ठेऊन आहोत हे त्याने कोर्टाला त्या बायकांच्या नावागावासह एका बेसावध क्षणी स्पष्ट शब्दात सांगितलं. व्हर्जिनियाचाही तोल गेला. अनेक पुरुषांशी आपले चोरटे संबंध असल्याचं तिने कोर्टात बेधडकपणे जाहीर केलं. त्या पुरुषसिंहांची नामावळीही कोर्टाला सादर केली. कोर्टाने सांगितलं, 'प्रश्न डिल्के व्यभिचारी आहे की नाही, किंवा व्हर्जिनिया व्यभिचारिणी आहे की नाही, हा नसून डिल्के आणि व्हर्जिनिया यांनी उभयता एकमेकांशी व्यभिचार केल्याचा सबळ पुरावा आहे की नाही, इतकाच आहे. डिल्के किंवा व्हर्जिनियाच्या पूर्वचारित्र्याशी कोर्टाला कर्तव्य नाही. तेव्हा, फालतू बटबट करू नका. मुद्याचं तेवढं बोला. तुम्ही उभया व्यभिचार केला काय, आणि कुणी फूस लावली?'

पुन्हा प्रश्न निर्माण झाला! कोर्टापुढे सबळ पुरावा उपलब्ध झाला नाही. वादी-प्रतिवादी पुन्हा निर्दोष सुटण्याचा क्षण जवळ आला. इतक्यात व्हर्जिनियाची थोरली वहिण, की जिचं डिल्केने आपला धाकटा भाऊ ॲस्टन ह्याच्याशी लग्न लावून दिलं होतं, ती कोर्टापुढे हजर झाली आणि तिने सांगितलं, 'डिल्के नुकताच माझ्याकडे आला होता आणि त्याने मला सांगितलं की व्हर्जिनिया जर खटला मागे घ्यायला कबूल असेल तर आपण तिला पैसे चारायला तयार आहोत! ह्यावरून दिसतं की डिल्कने काही तरी काळंबेरं केलेलं असावं.'

इथून प्रकरणाला कलाटणी मिळाली. डिल्केच्या धाकट्या भावजयीची साक्ष कोर्टाने ग्राह्य ठरवली. व्यभिचार कर्माला आपण सरावलेले आहोत असा डिल्केच्या तोंडचा जबाब होताच. कोर्टाने पुन्हा साक्षी-पुरावे चाळले. बाचाबाची झाली. डिल्के दोषी ठरला. एका गृहिणीशी स्वत: होऊन व्यभिचारकर्म केल्याचा गुन्हा डिल्केच्या हातून घडला आहे असा न्यायमूर्तींनी निकाल दिला. व्यभिचारकर्मात सहभागी होणाऱ्या स्त्रीला कायद्यात शिक्षा नसतेच. कायदा जरी सर्वांना समान असला तरी व्यभिचारकर्माच्या प्रकरणात अपवाद केलेला आहे. व्यभिचारकर्मात गुरफटलेली स्त्री कायद्याच्या दृष्टीने नेहमीच निर्दोष असते. निदान, तिच्याबाबतीत तो दखलपात्र गुन्हा नसतो. त्यामुळे डिल्केच्या नशिबी शिक्षा आली. व्हर्जिनिया सुटली.

ह्या निवाडा जाहीर व्हायच्या दोन महिने अगोदरच डिल्केने आपल्या मंत्रीपदाचा स्वेच्छेने राजीनामा दिलेला होता. तेव्हा कायद्याच्या दृष्टीने गुन्हेगार ठरल्यामुळे मंत्रीमंडळातून त्याला डिच्चू देण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही. देवदयेने ती विटंबना टळली. मात्र ह्या क्षुल्लक प्रकरणानंतर डिल्के सार्वजनिक जीवनातून जो हुसकावला गेला तो कायमचाच. एरव्ही ज्याच्या अंगावर ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पंतप्रधानपदाची ऐश्वर्यमान्य वस्त्र झुलण्याचा योग अगदी उंबरठ्यापर्यंत चालून आला होता, त्याने खाजगी लैंगिक उपभोगांची वाच्यता न करण्याचा विवेक न दाखविल्यामुळे त्याच्यावर जन्मभर बागकाम करीत बसण्याची पाळी यावी ही परिसीमाच म्हटली पाहिजे.

पण डिल्के खरोखरच दोषी होता काय? डिल्केने विवाहसंस्थेचं पावित्र्य वगैरे सारं थोतांड गुंडाळून ठेवलेलं होतं, हा तर प्रत्यक्ष त्याच्याच तोंडचा जबाब आहे. प्रश्न तो नाही. व्हर्जिनियाचं नि त्याचं काही सूत होतं काय नि असल्यास त्याने तिला फूस लावली होती काय, एवढाच प्रश्न आहे. त्यावेळीही अनेक विधीतज्ज्ञांचं ठाम मत होतं, की आपल्या पंतप्रधानकीच्या मार्गातून डिल्केची संभाव्य अडगळ दूर करण्यासाठी, त्यावेळच्या महत्त्वाकांक्षी मंत्र्यांनी डिल्केवर हे कुभांड रचलं होतं. व्हर्जिनियाने डिल्केचं चारित्र्यहनन करण्यासाठी काही कारस्थानी राजकारणपटू मंत्र्याकडून भाड खाल्ली होती, असा अनेकांचा सबळ तर्क आहे. पण कायदा बिनबुडाचा तर्कबिर्क जाणत नाही. कायदा फक्त समोर आलेला पुरावा जाणतो. पुढे

व्हर्जिनियाने खरी भानगड, किंवा सत्य काय आहे ते मॅनिंग नावाच्या रोमन कॅथॉलीक धर्मगुरूला पापक्षालनार्थ कन्फेशन देताना सांगितलं. पण पुन्हा, धर्माज्ञे-प्रमाणे ईश्वरासाठी म्हणून केलेल्या कबुलीजबाबाची वाच्यता धर्मगुरू इतरांजवळ करू शकत नाही ! त्यामुळे मूळ सत्य अखेरपर्यंत गुलदस्तातच राहीलं. पुढे डिल्के वारला. विषण्ण स्मित करीत लेडी स्मिथ वारली. क्रॉफर्ड धसका खाऊन वारला. नातवंडा-पतवंडांची तोंडं पाहून व्हर्जिनिया वारली. धर्मगुरू मॅनिंग तोंड बंद ठेवून वारला. डिल्केने भोगलेल्या बायकांनी शांतपणे डोळे मिटले. व्हर्जिनियाने ज्यांना भोग लुटू दिला ते पुरुष कृतार्थ होऊन थडग्यात गेले. आता मागे उरली आहेत फक्त ब्रिटिश म्युझियममध्ये अभ्यासकांच्या सोईसाठी जपून ठेवलेली ह्या डिल्के-प्रकरणाची वाळून पिवळी पडत चाललेली कागदपत्रं. सत्य जे त्यावेळपासून सांडलं ते सांडलंच. आता ते कदापिही गवसणार नाही. शंभर वर्षं होऊन गेली आहेत. तेव्हा त्या सत्याचा नाद आपण सोडूया. तुमच्या आमच्यापुरतं सत्य फक्त एकच आहे की, चोरट्या प्रेमप्रकरणांची कहाणी कधीही शिळी होत नाही; आणि व्यभिचारकर्माच्या कथेचे गहिरे रंग टक्क उन्हात डुलणाऱ्या जास्वंदीच्या टवटवीत फुलासारखे सदैव ताजेच असतात. □ □ □



# मराठवाडा विदारक चित्र

नंदकिशोर भार्गव

श्री. अनिल बर्वे यांचा (स्वदेशी वसाहतवादाचा बळी—मराठवाडा १९-४-७२) लेख बराच अपूर्ण असूनदेखील खूप आनंद देऊन गेला. अर्थात लेख अपूर्ण असल्या-बद्दल श्री. बर्वेंना दोष देण्यात स्वारस्य नाही. मराठवाड्यात येऊन अजून अंगा-वरचा पुरता घाम वाळला नसेल तेवढ्यात त्यांच्या मराठवाड्यातील वास्तव्यावर बंदी हुकूम आणून त्यांना हुसकण्यात आले. मिळालेल्या थोड्याश्या वेळात त्यांनी जेवढी माहिती मिळविली त्याचेच उलट कौतुक केले पाहिजे. Law and order ची आमच्या मायबाप सरकारला केवढी चिंता. जनहिताचा केवढा कळवळा! मी कदाचित श्री. बर्वेंना ह्याबाबत थोडी मदत करू शकेन या अपेक्षेने ह्या लेखाचा उद्योग.

कृषि-विद्यापीठाच्या निमित्ताने शासनाने प्रथमच मराठवाड्याची दखल घेतली—किंबहुना हिंगोलीच्या त्या गाढवाने शासनास तसे करण्यास भाग पाडले म्हणणे जास्त संयुक्तिक ठरेल. आता माणूसही जागे झाले व शेवटी मराठवाड्यात काय होतय् हे त्याने पहावयाचे ठरविले. भाग्य उजळले 'गाढव' जातीचे. सध्या नाशिककरदेखील विद्यापीठासाठी गाढवाचाच उपयोग करायची भाषा बोलत आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात निझामच्या राजवटीत मराठवाड्याची उपेक्षा व शोषण पद्धतशीरपणे झाले त्याची नोंद आपण घेतलीच आहे. परंतु स्वातंत्र्यानंतरच्या काळात जे झाले ते त्याहून जास्त भयंकर आहे. हैद्राबादची निझामी राजवट ही बोलून चालून 'शोषक' राजवट होती, रियासत होती. 'लोकहितवादी' असल्याचा टेंभा त्यांनी कधी मिरवला नव्हता, की 'लोकाभिमुख शासनाचे' गोडवे त्या राजवटीने कधी गायले नव्हते. पोलीस ॲक्शननंतर हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले.

मुख्यमंत्री पदासाठी—तेलंगण—कर्नाटक—मराठवाडा ह्या वेगवेगळ्या भाषीक गटात थोडी रस्सीखेच होऊन श्री. बी. रामकृष्णरावची सरशी झाली व पर्यायाने मराठवाड्याचे अनभिषिक्त एकमेव नेते श्री. स्वामी रामानंद तीर्थ मागे पडले. येथेच मराठवाड्याच्या दुर्दैवाला खरी सुरुवात झाली. साधारण ३० टक्के जनता व लोक प्रतिनिधींची साथ घेऊन आपण 'तेलंगण'च्या नेतृत्वापुढे टिकाव धरू शकत नाही ह्याची जाणीव (!) मराठवाड्याच्या भ्याड नेतृत्वाला झाली. स्वामीजींसारख्या निस्वार्थ नेत्याच्या मनात कदाचित अशी शंका आली असावी की, त्यांच्या व रामकृष्णरावच्या मतभेदामुळे मराठवाड्याचे नुकसान होईल व त्यांनी लवकरच active राजकारणातून काढता पाय घेतला. ह्याला मनाचा मोठेपणा म्हणावे की त्याला 'भ्याड' ही संज्ञा द्यावी. कोणी ठरवावे? पण शेवटी व्हायचे तेच झाले. आधीच दुबळे असलेल्या मराठवाड्याच्या नेतृत्वाचे कंबरडेच मोडले व वल्हे नसलेल्या तारुप्रमाणे ते हेलकावे खात राहिले. ह्या परिस्थितीत दिगबरराव बिंदू, फूलचंद गांधी, गोपाळराव एकबोटे, देवीसिंग चव्हाण इत्यादींचे तेव्हांचे नेतृत्व फार थिटे पडले. स्वामीजींनी अशा नाजूक क्षणी थोडासा खंबीरपणा दाखवावयास हवा होता. तसे झाले असते तर...

दरम्यान भाषावार प्रांतरचना आली. मराठवाड्याने पतिव्रता नारीप्रमाणे कोणताही हट्ट न करता आपल्या दादल्याबरोबर घरोबा करावयाचा निर्णय घेतला. कशाचा हट्ट नाही, कोणत्या अटी नाहीत, कसले claims नाहीत, कोणतेही आढेवेढे नाहीत—महाराष्ट्रात विलीनीकरणाचा निर्णय एकमुखी तर होताच पण दुसऱ्या कोणत्या पर्यायी योजनेचा विचारदेखील तेव्हा मराठवाड्याने केला नाही, हे नमूद करणे आवश्यक वाटते. त्रिभाषी हैद्राबाद संस्थानातून सुटका होऊन महाराष्ट्रात विलीन झाल्याबरोबर आपल्या 'सुवर्ण—युगा'ची सुरुवात होईल ही मराठवाड्याची भाबडी आशा. तो आशावाद किती भाबडा व मूर्खपणाचा ठरला हे वेगळे सांगावयाची जरूर नाही.

आपले सधीसाधू व दुबळे नेतृत्व व आपसातील फूट इत्यादी गुणांनी मराठवाड्याच्या उपेक्षेला खूपच हातभार लावला यात शंका नाही. तरीही पश्चिम महाराष्ट्र, नागपूर, विदर्भ व मुंबईशहर ह्या महाराष्ट्राच्या शक्तीशाली गटांनी पद्धतशीरपणे मराठवाड्याची गळचेपी केली हे देखील तेवढेच खरे. मराठवाड्याची गेल्या काही वर्षांत विविध क्षेत्रातील झालेल्या प्रगती (?)चा आढावा घेतला तर कितीतरी धक्का देणाऱ्या गोष्टी बाहेर येतील. पण हा उद्योग करावयाचा कोणी?

अर्थात् मराठवाड्याच्या सध्याच्या परिस्थितीला आमची इकडची जनतादेखील जबाबदार आहे. मराठवाड्यातील माणूस साधारणपणे अतिशय आळशी, बेजबाबदार आणि अल्पसंतोषी आहे. परिस्थितीला तो स्वतः जबाबदार आहे याची दखल

तो कधीच घेणार नाही. उलट प्राप्त परिस्थिती ही 'नशीबा'च्या कृपेमुळे आहे व काही करता त्यात फरक होऊ शकत नाही असा विश्वास त्याला असतो. कठीण श्रम करून, परिस्थितीशी टक्कर देऊन त्यात सुधारणा करता येईल असा आत्मविश्वास निर्माण करणे हे एक मोठे कठीण कार्य आहे.

समाजवादी समाजरचनेची झूल अंगावर घेऊन मुंबई व दिल्लीच्या वाऱ्या करणाऱ्या आमच्या बैलजोडी नेतृत्वाला स्वत:च्या खुर्च्या व टोप्या सांभाळण्यापलीकडे काही करावेसे वाटलेच नाही हे एक कटु सत्य आहे. यात काही अपवादही होते पण त्यांनी प्रथम आपले नेतृत्व बळकट करण्यात वेळ घालवला व कार्यक्षेत्राला जिल्हा व तालुक्याच्या सीमा बांधून घेतल्या. ह्या लोकांना कार्य विस्ताराची संधी आली तेव्हा आम्ही 'भाऊबंदकी' करून त्यांचे पाय ओढले.

दरम्यान खूप उलाढाल झाली. समाजवादी समाजरचनेच्या दिशेने वाटचाल करणारे आता समाजवादाच्या इप्सीत ध्येयासाठी धावू लागले. 'गरिबी हटाव'चे उद्घोष आसमंतात निनादू लागले. बैलजोडी जुनी व निकामी—कदाचित म्हातारीदेखील—होऊन त्याची जागा तरण्याताठ्या गाय वासराने घेतली. ह्या समाजवादी गायीचे दूध साऱ्या जनतेला मिळणार की तिची वासरेच सगळे दूध पिऊन टाकणार हे फक्त काळच सांगू शकेल. मराठवाड्याच्या ध्येयशून्य नेतृत्वाला ह्या क्षणीदेखील नक्की वाट सापडलीच नाही.

साहेबांबरोबर जुन्या काँग्रेसकडून नव्या काँग्रेसकडे कोलांटी उडी घेतल्यानंतर शंकरराव चव्हाण का वसंतराव नाईक ह्या वादात पुन्हा एकदा मराठवाड्यातील नेतृत्वाने स्वत:च्या दिवाळखोर धोरणाचे प्रदर्शन केले व येत्या काही वर्षांसाठी पूर्वीपेक्षा जास्त उपेक्षेची पक्की व्यवस्था करून ठेवली इतपत शंका आली तर ती अवास्तव म्हणता येणार नाही.

## याला जबाबदार कोण ?

सध्या काम चालू असलेल्या जायकवाडी प्रकल्प आणि फारतर पूर्णा प्रकल्पचा अपवाद वगळता मराठवाड्यात जलसिंचनाची कोणतीच अशी उल्लेखनिय योजना गेल्या पंचवीस वर्षांत राबविता येवू नये ह्याला जबाबदार कोण व असे का व्हावे ह्याचा विचार कधीकाळी होईल का ? संपूर्ण भारताच्या मानाने जलसिंचन योजनेत महाराष्ट्र मागासलेलाच. महाराष्ट्राचे—पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ—नागपूर, मराठवाडा असे वेगवेगळे भाग पाडले व प्रत्येक भागातील जलसिंचित भूमि व कोरडवाहू जमिनीची आकडेवारी केली तर मराठवाड्याची काय दुर्दशा झाली आहे व होतही आहे ह्याचे संपूर्ण चित्र समोर येऊ शकेल. हीच आकडेवारी १९४७–४८ व १९७१–७२ ची वेगवेगळी काढली तर गेल्या २५ वर्षांत मराठवाड्याची ह्याही बाबतीत पिछेहाटच झालेली आढळेल. शतीविषयक संशोधन, खाजगी मालकीच्या विहिरीसाठी मदत, कूप-नलीका, बडींगचे काम आणि तत्सम अन्य योजणे


Swastik FOAM
is so intimate because...
It is restful: Lie back and relax. Swastik Foam offers a soft support to your tired limbs.
It is protective: Does not harbour insects and is anti-moisture too. Keeps cool and fresh by "breathing" through a million air-cells
It is dependable: Lasts a lifetime. Can be used wherever cushioning is needed, so you're always supported by the gentle firmness of Swastik Foam. Available in a wide range of ready-to-use items like back rests, car seats, bolsters, mattresses and pillows, as well as by the metre in hard, medium or soft foam.
Swastik Foam– for the rest in your life.
SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
Swastik House,
Kirkee, Poona 3.
Swastik FOAM

बाबतदेखील गेल्या २५ वर्षांत मराठवाड्याची प्रगती किती प्रेक्षणीय आहे याचा अंदाजा शासनानेच घ्यावा.

शेतकी महाविद्यालयाची तीच व्यथा. शेतकी महाविद्यालय झाल्याबरोबर मराठवाड्याची माळरान जमीन हिरवीगार होईल किंवा त्या जमिनीत सोने पिकू लागेल अशातला भाग नाही. परंतु मराठवाड्याच्या बाबतीत शासनाच्या मनात दुजाभाव कसा आहे आणि वेळोवेळी त्यावर कसा अन्याय होत आला त्याचा हवाच असेल तर हा एक पुरावा. शासनानेच नेमलेल्या समीतिने महाराष्ट्राच्या पहिल्या कृषि-विद्यापीठासाठी केलेली गोळेगाव (जिल्हा परभणी) ची शिफारस डावलली गेली व राहूरीला मानाचा मुजरा मिळाला. विदर्भातील प्रखर आंदोलनापुढे नमते घेवून दुसरे विद्यापीठ अकोल्यास मिळाले पण मराठवाड्यासाठी पुनश्च उपेक्षा व पोकळ आश्वासने. दहा वर्षांत मराठवाड्यास विद्यापीठ देण्याचे आश्वासन देणाऱ्या शासनाला त्यादिशेने पहिल्या तीन वर्षांत किती प्रगति झाली याचा आढावा घेण्याची आवश्यकताच वाटली नाही.

## गायीचे दूधच आटले

उस्मानाबाद किंवा नांदेड जिल्ह्यात दोन कोटी रुपये खर्चाची दुग्ध प्रकल्पाची एक योजना जाहीर झाली होती अन् जिल्ह्यातील लोकांना वाजवी दराने, भेसळ नसलेले दूध बाटल्यातून मिळत असल्याची स्वप्ने पडू लागली. कोठेतरी माशी शिकली अन मायबाप सरकारच्या गायीचे दूधच आटले. योजना बारगळली.

वीज निर्मिती व पुरवठ्याबाबतीत तेच. मराठवाड्यात दिल्या जाणाऱ्या विजेचा दर कदाचित महाराष्ट्रात सर्वांत जास्त असावा. कोयना-परळी-पारसचे ग्रिड करून येत्या वर्षांत मराठवाड्याला भरपूर वीज दिली जाईल असे सरकारचे धोरण शेवटपर्यंत चालू राहील अशी अपेक्षा. परळीचे थर्मल स्टेशन (गंगाखेडचे नव्हे) नासिकच्या मानाने अर्धे व कोराडी (नागपूर) च्या पहिल्या टप्प्याच्या मानाने एकचतुर्थांशच.

गेल्या वीस वर्षांच्या नियोजन काळात महाराष्ट्र शासन मराठवाड्याला एकही मोठा सरकारी-निमसरकारी उद्योग देवू शकले नाही. महाराष्ट्रातील मागासलेल्या (मराठवाड्यासारख्या) भागाच्या औद्योगिकरणासाठी झपाटलेल्या शासनाला मराठवाड्यासाठी एकही अशी योजना सुचली नाही ह्यापरी आमचे दुर्दैव ते काय? गेल्या दोन-तीन वर्षांत मराठवाडा डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या मदतीने फक्त औरंगाबाद शहरात (दुसऱ्या काही शहरातील विणकर गाळ्यांचा अपवाद वगळता) काही नवे प्रकल्प उभे होत आहेत हे खरे. पण फक्त औरंगाबाद शहर म्हणजे मराठवाडा नव्हे याची जाणीव शासनाला कधीतरी होईल अशी आशा. मध्यवर्ती शासनातर्फे देखील कोणतीही योजना ह्या भागात साकार होऊ शकली नाही. 'मिग' सारखी एकादी योजना नासिक-ओझर ऐवजी किंवा हेवी इलेक्ट्रीक व हिंदुस्थान मशीन टूलसचा एकादा विभाग हैद्राबादऐवजी मागासलेल्या मराठवाड्यात उभा करता

आला असता तर मराठवाड्याचा कायापलट झाला असता एवढे मात्र निश्चित.

शैक्षणिक क्षेत्रात मराठवाड्यात भरीव कामगिरी झाली अशी आकडेवारी पुढे करता येईल. एका दृष्टिकोणातून ते खरेही आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महाविद्यालयीन शिक्षणासाठी औरंगाबादचे शासकीय महाविद्यालय हे एकमेव कॉलेज. दहा वर्षांपूर्वी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली अन् सध्या सुमारे १०० महाविद्यालये आज मराठवाड्यात विद्यादान करीत आहेत. आकडेवारी छान वाटते पण थोडेसे खोल गेल्यास त्याचा पोकळपणा जाणवतो.

## तीच रडकथा

औरंगाबादची मेडिकल व इंजिनीयरिंग कॉलेजेस्, गाजलेल्या परभणीचे कृषी–विद्यालय व नांदेडचे आयुर्वेद महाविद्यालय वगळता बाकी सर्व पारंपारिक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये. अंबाजोगाईला मराठवाड्याचे दुसरे मेडिकल कॉलिज होणार अशा वावड्या खूप वर्षे उडत आहेत. परंतु त्या दृष्टीने आवश्यक असलेली कोणतीच पूर्वतयारी अजूनतरी झालेली नाही. अंबाजोगाईला दवाखाना आहे खरा, परंतु मेडिकल कॉलेजसाठी संलग्न दवाखान्याला ज्या सुखसोयी व उपकरणे असणे आवश्यक असते त्यापैकी कितीतरी अजून तेथे नाहीत व त्या असाव्यात ह्या दृष्टीने कोणता प्रयत्न झाल्याचे किंवा होत असल्याचे ऐकीवात नाही. पुढेमागे अंबाजोगाईला मेडिकल कॉलेज काढण्यासाठी तेथल्या दवाखान्यात आवश्यक त्या सुखसोयी व उपकरणे नाहीत ह्या सबबीखाली ती योजना बारगळण्याचा तर शासनाचा विचार नाही ना अशी शंका येते.

लातूरला असलेले पॉलिटेक्निकदेखील लवकरच बंद होणार अशी वदंता आहे. तेथील बऱ्याच शिक्षकांच्या बदल्या तरी करण्यात आल्या आहेत किंवा त्यांना नोकरीवरून कमी तरी करण्यात आले आहे. लातूर पॉलिटेक्निकचा गळा दाबून त्याहूनही वाईट स्थितीत असलेल्या नांदेड पॉलिटेक्नीकचा जीव वाचविण्याचा प्रयत्न होत आहे. ह्या ऑक्सीजनच्या तात्पुरत्या पुरवठ्याच्या जोरावर नांदेड पॉलिटेक्निक किती दिवस जगेल कोणास ठाऊक ?

भारतभर प्रसिद्ध असलेल्या देवणी बैलाची पैदास ज्या भागात होते त्या भागात एखादे पशु वैद्यकीय महाविद्यालयदेखील असू नये ह्याला काय म्हणावे ? मराठवाड्यात दुसरे इंजिनीयरिंग कॉलेज, अंबाजोगाईचे मेडिकल कॉलेज व केमिकल टेक्नोलॉजीसारखे शिक्षणक्रम असलेले एखादे महाविद्यालय कधीकाळी सुरू होऊ शकेल का?

उत्तम प्रतिची व जलद वहातूक करणारी व्यवस्था असणे ही कोणत्याही भागाची प्रगति साधण्यासाठी मूलभूत गरज आहे ह्यात दुमत असू शकत नाही. प्रगतिच्या दिशेने घोडदौड करण्यासाठी व समृद्धीचे वारे मागासलेल्या भागात खेळवायचे असेल तर प्रथम वहातूक व्यवस्था सुधारली पाहिजे. त्या दृष्टीने विचार केला तर ह्या बाबतीतदेखील मराठवाड्याची किती मुस्कटदाबी होते, याचे विदारक चित्रच समोर येते.

# बारगळलेली रेल्वे योजना

१९५० च्या सुमारास रेल्वेने तत्त्वतः मान्य केलेली लातूर-मिरज नॅरोगेजचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करून पुढे तिला बोधन-निझामबाद करीत काझीपेठ-बल्लारशहा मेन लाईनला रामगुंडम येथे जोडण्याची योजना केव्हा व का बारगळली ह्याची दखल आजतागायत कोणी घेतली नाही. सोलापूर–बीड–औरंगाबाद–जळगाव ब्रॉडगेज रेल्वेची संकल्पित योजना अजूनही रेल्वे बोर्डाच्या दप्तरी धूळ खात पडली आहे. ह्या योजनेला कधीकाळी मूर्त स्वरूप मिळेल का नाही कोणी सांगावे. मुंबई-साठी मुळज घाटातून जाणाऱ्या योजनेसाठी लागणारा पैसा आहे. ती योजना समोर येते काय, लगेच त्याला मान्यताही मिळते, थोडया दिवसात त्या मार्गावर रेल्वे धावूही लागेल. पण मराठवाडयाचा कायापलट करू शकेल अशा ह्या योजना ह्या योजनेपेक्षा कितीतरी जुन्या असूनदेखील अजून 'विचाराधीन'च आहेत.

मराठवाडयाचा व त्याबरोबर पश्चिमेस असलेल्या सोलापूर जिल्ह्याचा व पूर्वेकडील यवतमाळ जिल्ह्याचा विकास घडवून ह्या मागासलेल्या भागाचा काया-पालट करू शकणारी क्षमता असणाऱ्या दुसऱ्या काही रेल्वे मार्गाचा आजतागायत विचार का होऊ शकला नाही याचे मला कोडे पडते. कोल्हापूर-मिरज ब्रॉडगेजला जोडून असलेल्या व सध्या नॅरोगेज असलेल्या मिरज-पंढरपूर-बार्शी-लातूर मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करून लातूर-अहमदपूर-नांदेड करीत यवतमाळवरून ह्या फाटयाला वर्ध्यापर्यंत जोडता आले तर नागपूर ते कोल्हापूर हे अंतर खूप कमी होईल. व वर्ध्यापासून पुढे कोल्हापूरपर्यंत ही रेल्वे महाराष्ट्राच्या अत्यंत मागास-लेल्या भागातून जाते व पर्यायाने ह्या भागाच्या विकासासाठी ह्या मार्गाचा खूप फायदा होईल. इतकेच नव्हे तर पूर्व भारत – अर्थात ओरीसा, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम आदी भागाकडून होणारी वहातूक महाराष्ट्राच्या ह्या भागात व म्हैसूर राज्यात जलद व सोयीची होईल.

ह्या बरोबरच लातूर-उदगीर-सिद्दीपेठ (आंध्रप्रदेश) मार्गाने काझीपेठपर्यंत ब्रॉडगेज लाइन करता आली तर मुंबई ते भारताच्या पूर्व किनाऱ्यावर असलेले विशाखापट्टणचे अंतर कितीतरी कमी होईल व सिंगारेणी, कोथागुडुम आदी कोळशाच्या खाणीतून मुंबईला कोळशाचा पुरवठा ह्या मार्गाने करता येईल. सध्या हाच पुरवठा काझीपेठ-हैद्राबाद-विकाराबाद-वाडी-मुंबई ह्या मार्गाने होतो. ह्या मार्गावर असलेल्या वाहतुकीचा दाब कमी करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी ह्या पर्यायी मार्गाचा खूप उपयोग होईल.

हैद्राबाद संस्थानातील रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनकडील बसेस भाषावर प्रांत-रचनेच्या वेळी महाराष्ट्र-म्हैसूर-आंध्रप्रदेश मध्ये वाटण्यात आल्या. मराठवाडयाच्या नशीबात ह्यावेळी देखील अन्यायच वाढून ठेवलेले होते. जीर्ण-शीर्ण झालेल्या व जुनाट बसेस बहुतेक मराठवाडयाकडे पाठवून देण्यात आल्या. तदनंतर १५ वर्षांत

परिस्थिती फार सुधारल्यासारखी वाटत नाही. अजूनही मराठवाड्यातील बसेसची अवस्था बहुतांशी दयनीयच आहे.

महाराष्ट्रात विलीन होण्यापूर्वी मराठवाड्याच्या रस्त्यांची जी अवस्था होती त्यामानाने आता खूपच सुधारणा झाली आहे हे मान्य करावे लागेल. पण तरीही त्यात खूप सुधारणेची गरज आहे हे निश्चित. सध्या प्रमुख शहरांना-गावांना जोडणारे रस्ते चांगले आहेत हे कबूल परंतु रस्त्यांचे जाळे जसे असावयास पाहीजे त्यामानाने खूप कमी आहे. अजूनही कितीतरी छोटी छोटी गावे-खेडी मुख्य रस्त्याहून खूप दूर आहेत व सध्या असलेल्या त्या रस्त्यांची अवस्था भयंकरच आहे.

मी आपणास ह्या पत्राद्वारे जी माहिती देत आहे त्याला खूप बंधने आहेत. एकतर मी जे लिहीत आहे ती एक प्रतिक्रिया आहे – त्याच्या मागे 'अभ्यास' व आकडेवारीची जी पार्श्वभूमी असावी लागते ती नाही. त्यामुळे ही एक सर्वसाधारण माहिती झाली – ह्यापेक्षा त्याला जास्त महत्व नाही.

श्री. बर्वेंवर लादलेली बंदी मुंबई न्यायालयाने नियमबाह्य ठरविली आहे. माझे आपणास आवाहन आहे की आपण श्री. बर्वेंना (किंवा दुसऱ्या कोणाला) मराठवाड्यात काही दिवसाकरिता पाठवावे व मराठवाड्यावर झालेल्या व होत असलेल्या अन्यायाला चव्हाटयावर आणण्याचे सत्कार्य करावे. मराठवाडा आपला अनंतकाल ऋणी राहील.

□ □ □




## कविता

### श्रद्धा

असेच कधी जातात श्रद्धेला तडे
पडते अंतराला भेग......
विषण्ण मन गहिवरतं पण
तेही आतल्या आत......
ओठावर असते फक्त फसवे हसे
स्वत:लाच फक्त फसवून
जगाला आनंदी दिसावे म्हणून......

असेच कधी जातात श्रद्धेला तडे
आपलेपणाला दोन्ही हातांनी......
तेव्हा कडकडून भेटताही येत नाही
नाती सगळी समोर उभी असतात
भातुकलीत मांडलेल्या......
कचकड्याच्या बाहुल्याप्रमाणे......!
त्यानाही कळते दुखावलेले अंतर
पण त्यांच्या माझ्यात असते
अतरा अंतराचे अंतर......
तेव्हाही विषण्ण मन गहिवरते
पण दरड कोसळावी तसे.. ...
ओठावर असते न फुटणारी कैफियत
स्वत:ला फसवलेले नसते म्हणून......
असेच कधी श्रद्धेला जातात तडे
श्रद्धा ठेवून जगायचं म्हणून
श्रद्धेत विरून जाताना......!

रमाकांत वैद्य

## रात्रगाणे

रात्री–रात्रींना फुलला, हितगुजांचा बहर
व्रात्य–निद्रेला जागवी, शब्दबावरी नजर ।।
रात्री–रात्रींनी भोगले स्पर्शगंधाचे हो क्षण
केले कातर कैफात कवितेला निमंत्रण ।।
रात्री–रात्रींना पुसत आला चंद्रमा लाजरा
आर्त आकाशी उठला, एक आनंदी शहारा ।।
रात्री–रात्रींना चढला, पूर्वरंग मदधुंद ।
उणे प्रीतीचे उखाणे, उपचार सारे बंद ।।
रात्री-रात्रींना फुटला, भाव-स्वप्नांचा घुमारा ।
भान लोपुनी गाठला, हळू पहाट-उंबरा ।।
रात्री–रात्रींना खुलला मिटलेली कळी कळी ।
रुणझुणे अंतरात आता अमर भूपाळी ।।

मुकुंद इनामदार


---

**आस्वाद**

रमाकांत वैद्य यांची ‘श्रद्धा’ ही कविता एक नेहमीचा अनुभव विलक्षण समजूतदार आर्ततेने सांगताना दिसते. श्रद्धेला तडा गेल्यामुळे अंतरंगी दुभंगलेले मन आणि बाह्यत: आनंदी राहण्याची धडपड यातील विसंगती स्वत:चीच फसवणूक करीत असते. कवीने हा अनुभव अतिशय खरेपणाने व्यक्त केला आहे. याप्रसंगी मनाची झालेली अवस्था वर्णन करताना आपलेपणाला दोन्ही हातांनी कडकडून भेटता न येणे, भातुकलीत मांडलेल्या कचकडयाच्या बाहुल्यांप्रमाणे सगळी नाती समोर उभी असणे, दरड कोसळावी तसे मन गहिवरणे वगैरे प्रतिमा अत्यंत प्रत्ययकारी रेखल्या आहेत.स्वत:चा हृद्य अनुभव हृद्यतेने आविष्कृत करण्याचे सामर्थ्य कवीच्या भाषेत आहे.

मुकुंद इनामदार यांनी ‘रात्रगाणे’ गाताना एक वेगळाच पण छान सूर पकडला आहे. त्यांच्या कवितेतील रात्र हळूवार भावनांनी मोहरलेली आणि रमणीयतेने दरवळणारी आहे. हित गुजांचा बहर फुलला आहे, शब्दबावरी नजर व्रात्य निद्रेला जागवीत आहे आणि स्पर्शगंधांच्या कातर कैफात कविता फुलून आली आहे. लाजरा चंद्रमा, आर्त आकाश अशा निसर्गाच्या भावमुग्ध साथीत रात्रीला भावस्वप्नांचा घुमारा फुटला आहे. शब्दांच्या लडिवाळ महिरपीत जडवलेला हा सुंदर अनुभव ‘रात्रीरात्रींच्या’ आवर्तनाने रात्रगाण्यात मधुरतेने साकार झाला आहे. या आवर्तनांमुळे हे एकाच विशिष्ट रात्रीचा अनुभव न उरता त्याला एक सातत्याचे परिमाण लाभले आहे आणि त्यामुळे त्याचे सामान्यीकरण अधिक मोहक व सुलभ झाले आहे.

**– रसिक**



# अलिप्त

सौ. सुमती भिडे

विष्णुपंत स्वत:ला सुख-शान्तीचे सार समजत असत. त्यांच्या चेहऱ्यावर सदैव सौम्य प्रसन्नता पसरलेली असे. कोणाच्या एका छदामाचे ते मिंधे नव्हते. कर्तव्य म्हणून त्यांनी संसार केला. चोखपणे नोकरी केली. ईश्वरकृपेने मुलेही

ह्या घडीत बसणारीच निघाली. व्यवस्थितपणे अभ्यास करून कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे स्वतः स्कॉलरशीप मिळवून थोरला अमेरिकेत गेला. नि धाकटा इंजिनिअर होऊन गेल्याच वर्षी त्याचे लग्न करून दिले. पण त्या एवढयाश्या अठरा-वीस वर्षे वयाच्या मुलीने ह्या घराची घडीच विस्कटून टाकली.

पंतांची शिस्त कडक असे. त्यांच्या वस्तूला, पुस्तकांना, त्यांच्या बागेला कोणी हात लावलेला खपत नसे त्यांना ! सर्व कसे नेटके, मोजके, असे घरात ! वाजवी गप्पा टप्पांना ह्या घरात थारा नव्हता. कुणाला काही सांगावे लागत नसे. घड्याळाच्या टिकटिकी बरोबर घरातले व्यवहार पार पडत होते. पण ही नवी सूनबाई आली नि किटकिट सुरू झाली.

मैत्रिणी काय ? हॉलमध्ये पसारा काय ? हसणे काय ? खिदळणे ? कशाला म्हणून ताळतंत्र राहिले नाही. बघता बघता पंतांची पत्नी; राधाबाई पण त्यात सामील झाल्या. हॉलमध्ये येऊन तोंडावर पदर धरीत त्या पण खुसूखुसू हसू लागल्या आणि कधी नव्हे ते पंतांचे पीत्त खवळू लागले. कपाळावर अठी उमटू लागली.

बाहेरून घरात यावे तर कधी चंदाचे, त्यांचे मुलाचे मित्र तर कधी हिच्या मैत्रिणी. रागावून पंत म्हणत—

"अरे काय, घर आहे का हॉटेल ? सारखे चहापाणी, रेडिओ, सिनेमे." तर सूनबाई म्हणे तोऱ्यात.

"आम्ही लाईफ एंजॉय करतो. मामंजी."

देवघरात, अभ्यासिकेत कुठेही असले तरी घंटेच्या आवाजाप्रमाणे सूनबाईची बडबड ऐकू यायची, घरातील शान्ती भंग पावली होती.

पण गेले काही महिने चंदाने वेगळे बिऱ्हाड केल्यापासून परत शान्त झाले होते आणि पंतांना उगाचच चुकल्या चुकल्या सारखे वाटत होते.

आजही त्यांनी पूजा उरकली. पूजेचे साहित्य आवरून सर्व वस्तू जागच्या जागी ठेवल्यानंतर तीर्थाचे ताम्हन घेऊन ते मागील दारी तुळशीवृंदावनापाशी गेले. तीर्थ तुळशीत ओतून वर आलेल्या सूर्यनारायणाला अर्ध्य देऊन त्यांनी भक्तीभावाने हात जोडले. तोच "आजोबा" म्हणून त्यांनी हाक ऐकली म्हणून त्यांनी मागे वळून पाहिले.

बागेच्या कोपऱ्यालगत असलेल्या कंपाऊडच्या तारेवर एक ३।४ वर्षांची मुलगी ओंठगून उभी होती. गोऱ्या गुबगुबीत लालसर चेहऱ्यावर नुकत्याच उगवलेल्या सूर्याची किरणे पडली होती. ती मुलगी तन-मन लावून त्या फुलाकडे पाहत होती.

"कोण ग तू ?"

त्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून तिने त्या अर्धोन्मलीत फुलाकडे बोट केले. ते सुंदर गुलाबपुष्प सूर्याच्या प्रकाशात चमकत होते.

" द्याना ते फूल. आजोबा. "

तिच्या परत परत आजोबा म्हणण्याने त्यांच्या मनात क्षणभर कुठेतरी गलबलले. उगाच डोळे मोठे करून त्यांनी तिच्याकडे पाहिले आणि ओरडले.

" तुझ्या बापाची बाग काय गो ? "

ती बिचारी घाबरून तारेवरून खाली उतरली आणि घराकडे धावली. विष्णुपंत स्वत:च दचकले.

फुलावरून तर भांडण केले सुनेने नि वेगळी निघाली. फुले फक्त देवाच्या पूजेला घ्यायची अशी त्यांची पद्धत होती. सुंदर फुलांना झाडावरून काढून सुकवणे त्यांना पसंत नव्हते. बहरलेली कुन्दाची वेल संध्याकाळी रिती पाहून खुरपणी थांबवून ते घरात आले.

फुले काय झाली गो. "

" तोडली असतील श्यामाने. "

" तुम्ही तिला ह्या घरची शिस्त लावायच्या ऐवजी तुम्हीच बदलत चाललात. "

" इश्य एवढे काय फुलांचे, लहान आहे, आवड असते फुलांची. येवढी वेल उमलली आहे. उद्या वेलीवर तरी सुकणारच म्हणते मी ! मग घालीनाका "

" आता तुमच्याकडून तत्त्वज्ञान शिकायचे बाकी राहिले होते. तुम्हीही सुनेच्या बरोबरीने वरतोंड करून बोलायला लागलात. काही मोठे-लहान, मान अपमान आहे की नाही. "

आणि हे फूल-प्रकरण तिथेच संपले नाही.

श्यामाने पंतांना चिठ्ठी लिहून ठेवली नि दोन दिवसांनीच वेगळे बिऱ्हाड केले.

मामंजी, आईंनी तिथे दिवस काढले. मला जमणार नाही. माझे मन कोमेजून जाईल तिथे ! इथे बसू नका, तिथे बसू नका, ह्याला हात लावू नका, फुले तोडू नका, बोलू नका, तुमची तत्त्वे थोर आहेत मान्य आहेत मला. माणसाने भोगवादी असू नये; पण सहजगत्या आपले हक्काचे जे असेल त्याचा खेळकरपणी का उपभोग घेऊ नये माणसाने ! मला त्या शांत गाभाऱ्यात दगड होऊन राहाणे जमणार नाही. आम्ही वेगळे बिऱ्हाड करीत आहोत. तुमचा आशीर्वाद द्या आम्हाला.

तुमची स्नुषा
श्यामा

संथ जलाशयात खडा टाकावा नि तरंग उठवून निघून जावे तसे त्यांचे मनाचे कप्प्यात पत्राचा कपटा टाकून ती निघून गेली.

हा त्यांचा अपमान होता. घराण्याचा अपमान होता. त्यांच्या इभ्रतीला नाही म्हटले तरी धक्काच लागला होता. लोक त्यांना म्हणत ' हल्लीची मुलेच अशी;

तुमच्यासारख्या देव माणसाशी जमेना. मग बाकीच्यांचे काय हो '

चंदा व श्यामाचे नाव त्यांनी टाकले.

परत शांत तालावर संसार सुरू झाला.

आणि एके दिवशी चंदाच्या येण्याने त्यांच्या कपाळावर अठी उमटली. थोडावेळ तिथे घुटमळत तो म्हणाला.

" बरंय ना बाबा "

" अरे आमचे काय वाईट व्हायचेय "

अधिक बोलणे न ऐकता तो सरळ आत गेला.

मायलेकांची काय कुजबूज चालली होती देव जाणे–

तो गेल्यावर राधाबाई बाहेर आल्या व विष्णुपंतांना म्हणाल्या,

" चंदा म्हणतो तू तिकडे येतेस का दोन महिने ? श्यामाला दिवस गेलेत. अन्न ठरत नाही. बेडरेस्ट सांगितलीय."

" मग तुमचे काय म्हणणे आहे."

" जावे म्हणते "

" जा आणि तिकडेच रहा. परत यायची गरज नाही "

राधाबाई निमूटपणे आत गेल्या.

आणि मनाची उलघाल करणारे काही महिने गेल्यावर चंदाचा मित्र सांगावा घेऊन आला.

" श्यामाला दवाखान्यात नेलेय. आईंना बोलावलेय "

" जाऊन बघून येते पोरीला "

" कशाला ! किती धावाधाव कराल, गेली घरातून तर विचारलेन तरी का ?"

" पण जीव रहात नाही "

" उगाच जीव लावू नये माणसाने, आता काय चार दिवस उरलेत आपले "

राधाबाई त्यांच्या गोऱ्यापान संथ चेहऱ्याकडे बघतच राहिल्या.

संध्याकाळची तिरपी उन्हे कौलघरांवरून सरकली नि काठी घेऊन पंत बाहेर पडले. राधाबाई आत बाहेर करीत होत्या.

" काही निरोप कसा आला नाही अजून " न राहावून पतीकडे पाहात त्या म्हणाल्या,

" ठीक होईल सर्व, उगाच काळजी करू नका, देवाला जाऊन येतो मी "

नकळत त्यांची पाऊले हॉस्पिटलच्या दिशेने पडली. गावात एकच तर ' मॅटर्निटी होम ' होते. उगाच हॉस्पिटल जवळून काठी आपटीत ते पुढे जाऊ लागले.

" बाबा "

त्यांनी वळून पाहिले. चंदाचा चेहरा पार उतरून गेला होता.

सर्व काही ठीक होईल, चंदाकडे वळून न पाहता ते पुढे चालू लागले.

रोज कितीतरी जीव जगात जन्मताहेत. ह्या साध्या गोष्टीत काळजी करण्या-सारखे काय ते त्यांना कळेना, अलिप्तपणे आपल्याशीच हसत ते चालू लागले.

ते पोचायच्या अगोदरच चंदा घरी आलेला होता.

" चंदा आलाय, मला जायला पाहिजे "

" एवढे डॉक्टर आहेत तिथे, तुम्ही आणखी जाऊन काय करणार !"

" लहान पोर आहे, धीर येतो माणसाला."

" आईंना घेऊन या लौकर म्हणाली." चंदा मध्येच बोलला.

" घर सोडून जाताना आम्ही काय बोललो होतो. साधी फुलांची तर गोष्ट."

" जाऊ का म्हणते मी. "

" हं, जा, बघा तुमचे तुम्हीच. "

मऊ भात व लिंबाचे लोणच्याची फोड त्यावर घेऊन राधाबाईंनी डबा भरून घेतला आणि त्या लगबगीने बाहेर पडल्या.

पंत बागेत गेले. शिशीर ऋतूमुळे झाडे सुकली होती. पानांचा पाचोळा वाऱ्या-वर भिरभिरत होता. वाकड्या तिकड्या फांद्यांची सावट खाली पडली होती. सकाळचे ते फूल आता पूर्ण उमलले होते.

तुळशी कट्ट्यावर ते टेकून बसले. मनात आठवणींची पाने भिरभिरत होती.

चंदाचे बारसे केवढ्या थाटाने केले होते; राधाच्या माहेरची सर्व माणसे आली होती.

" हे बघा. "

डबी उघडीत तिने दाखवले.

" हे काय ?"

आत सुंदर साखळी असलेले वदामाकृती सोन्याचे पिंपळपान होते.

" आपल्या बाळासाठी केलेय आज. "

" पण मी तर तूला एवढे पैसे दिले नव्हते. "

" घरखर्चातून उरतील ते बाजूला ठेवले मी. त्याचे घेतले. "

" म्हणजे चोरीच म्हणावयाची. "

" चोरी, राधा आश्चर्याने म्हणाली. मला वाटले होते आपण माझे कौतुक कराल. घरात काही कमी पडू न देता चार पैसे वाचवून बाळाला हा दागिना केला."

" पण त्याची काय गरज होती ? त्याला का कळणार आहे ? आपल्याच नजरेची हौस. शिवाय माझी फसवणूक. "

" मी काय कुठचे बाहेरचे पैसे आणून नाही घेतलेय. मी समजत होते की, येथले सर्व आपले हक्काचे आहे. परत असे होणार नाही. "

आणि खरंच म्हटल्याप्रमाणे वागली ती ! दिड़कीची वस्तू आली नाही घरात आपल्या संमतीशिवाय. राधेची चाहूल घेत त्यांनी स्वयंपाक घराकडे पाहिले.

वाऱ्याच्या झुळुकीने पडदा हालत होता. मग त्यांना जाणीव झाली की राधा दवाखान्यात गेली आहे.

स्वयंपाक घरात येऊन संध्येसाठी बसल्यावर तर त्यांना राधेची उणीव फारच भासू लागली. आज ३५ वर्षे ह्या वेळी ती इथेच असायची. मूक सावलीसारखी. त्यांच्या मागोमाग. त्यांच्या वेळा सांभाळत.

संध्या-स्त्रोत्रे, जेवण आटोपून बाहेर आल्यावर त्यांना फारच एकाकी वाटू लागले. रोज शांत, स्वस्थ झोपणाऱ्या त्यांच्या मनाला आज झोप येईना. आपले मन कमलपत्राप्रमाणे अलिप्त नसून सर्वात जास्त लडबडलेले आहे हे त्यांना स्पष्ट दिसून आले. घरांवर, बागेवर, राधेवर, सर्वांवर आपला जीव आहे हे त्यांना कळून चुकले. किंबहुना चंदावरच काय कालच्या सून म्हणून आलेल्या पोरीवर सुद्धा – रात्रभर ते तगमगत राहिले.

काय होईल बरे आपल्याला, नात. नातच व्हावी. सकाळच्या त्या गोड मुलीसारखी, तिला पिंपळपान करायला सांगू! चंद्याला केले तसे किंवा राधेलाच सांगू, "तुला काय हवे ते घे." ह्या आपल्यातील बदलाने त्यांचे तेच सुखावले. आपणच दवाखान्यात जाऊन यावे ह्या विचाराने ते उठले. चुलाणात पेटत घालून पाणी तापत ठेवले. तोच दारावर थाप ऐकू आली.

"बाबा."

घाई गर्दीत त्यांनी दार उघडले.

"बाबा, सुखरूप सुटका झाली. नात झालीय तुम्हाला."

"छान, छान."

"आई म्हणाली, जरा उजाडले की, येते जराश्याने."

"काही घाई नाही. ये आत. चहा घेऊन जा."


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासूण मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) पो. कतरी सराप (गया)**

चंदा आश्चर्याने बघतच राहिला. रात्रभर बायकोची प्रसूतीवेदनांची तळमळ पाहून तो थकला होता. घाबरला होता. त्याला वाटले बाबांना म्हणावे, 'तुमच्या पुण्याईने सर्व ठीक पार पडले. रात्रभरची धावपळ, हकीगत सांगावी असेही त्याच्या मनात आले. पण तो गप्प बसला कारण त्यावरील बाबांचे उत्तर त्याला माहीत होते.

'अरे, पुण्याई कसली? जीवनाच्या सुरुवातीपासून हे चालले आहे. रोज हजारो जीव सुखरूपपणे जन्मत आहेत.'

गरम चहाचा घोट त्याला सुखावित होता. त्याच्या बाबांनी त्याच्यासाठी केलेला चहा--

"काय ठीक आहे ना सर्व, इथे काही पुण्या-मुंबईसारख्या सोयी नाहीत. रात्रीच यावे म्हणत होतो तिकडे."

"आं", चंदाने आश्चर्याने विचारलेन.

"आणि हे बघ, तिला दवाखान्यातून इकडेच आणायची. तिथे करायला कोणी नाही."

"आं", बाबांकडे आश्चर्याने पाहात तो म्हणाला,

"आणि हे बघ, चुलाणावर मघाच पाणी तापत ठेवलेय. गरम पाण्याने अंघोळ करून घे. रात्रभर जागरणाने थकला असशील."

"आं."

"अरे आं, आं, काय करतोयस, मग आपण दोघेही तिकडेच जाऊ या!"

आता मात्र चंदाच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही.

"बाबा, तुम्ही?" एवढे दोनच शब्द तो म्हणाला आणि त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू तरारले.



# पुस्तके

## राऊ

### असामान्याचे स्वप्न पाहणारी सामान्य कादंबरी

**निशिकांत मिरजकर**

ऐतिहासिक कादंबरी कशासाठी लिहिली जाते? कशासाठी वाचली जाते? इतिहास आणि कादंबरी यांच्या कक्षा कुठे नि कशा परस्परांना छेदून जातात? ...हरिभाऊंच्यापासून या प्रश्नांच्या उत्तरांचा प्रवाह वळणावळणांनी बदलत गेलेला दिसेल. कल्पनेच्या तरंगावर अद्भुताच्या परिवलयात वास्तवाची जाणीव हरवून टाकणे हे एका काळी ऐतिहासिक कादंबरीचे ध्येय होते. नावापुरत्या ऐतिहासिक व्यक्ती आणि घटना आधाराला धरून त्यांच्याभोवती कल्पनेचे अवगुंठन उभारणे हे तिचे स्वरूप होते. कालांतराने हळूहळू ऐतिहासिक कादंबरी जास्त वास्तववादी बनू लागली. केवळ कल्पिताच्या अद्भुतरम्यतेत हरवण्यापेक्षा ऐतिहासिक व्यक्तीतला माणूस शोधण्यात ती रमू लागली. जुनाट वाडे, भुयारे, कारस्थाने नि लढाया यांच्यापेक्षा असामान्य व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचे पैलू प्रकाशात उजळण्याचे ध्येय तिला पसंत पडू लागले. हे असामान्य व्यक्तिमत्त्व कधी रूढ समजुतीला धक्का देणारे, तर कधी रूढ समजुतीला मान्य असणारे.

'राऊ' या कादंबरीलाही असेच एका असामान्य व्यक्तिमत्त्वाचे स्वप्न साकार करावयाचे आहे. अखिल हिंदुस्थानात समशेरीचा जंग गाजविणाऱ्या पहिल्या बाजीरावाचे हे असामान्यत्व आहे. कोवळ्या वयात फार मोठी जबाबदारी ईर्ष्येने पेलून हिंदवी स्वराज्याची नौबत दिल्लीपर्यंत झडविणाऱ्या मर्दानी पुरुषाचे अंतरंग उलगडण्याची जिद्द या कादंबरीच्या उभारणीत आहे. रणांगणावर शौर्य गाजविणाऱ्या बाजीरावाची आगळी प्रेम कहाणी या कादंबरीला सांगावयाची आहे.

तत्कालीन वातावरण आणि समजुती यांना चक्रावून टाकणारी ही प्रेमकहाणी आहे. हिंदुस्थानचा पेशवा आणि एक यवन कंचनी यांच्या प्रीतीची कहाणी. मुळातच विरोधलयीत हिंदोळून उठलेली. या अजब प्रीतीच्या उत्कटतेचा गंध या कादंबरीला उलगडून दाखवायचा आहे. "त्याच्या गरुडदृष्टीनं निळचा आकाशाचा वेध केव्हाच घेतला होता. विशाल जीवन जगण्याची त्याची क्षमता होती. परिस्थितीनं ते अपरिहार्यही होतं. पण ही अपरिहार्यता त्याच्या कुटुंबियांना आकळली नाही आणि संघर्षाचा वणवा पेटला." असे यातल्या संघर्षाचे स्वरूप स्वत: लेखकाने सांगितलेले आहे. हा संघर्ष या कादंबरीचा आत्मा आहे. समर्पणाच्या धुंदीने मस्तानीसारख्या यवनीवर प्रीतीची उधळण करणारा ब्राह्मण पेशवा बाजीराव आणि समाजातल्या रूढ समजुतींना जपणारी व त्यासाठी या प्रीतीला विरोध करणारी त्याची कुटुंबीय मंडळी यांच्यातील हा अगदी प्रामाणिक संघर्ष आहे.

संघर्षाचे चित्रण करताना लेखकाने दोन्ही बाजूंना चांगला न्याय दिलेला आहे. त्यात एकांगीपणा नाही. सुष्टदुष्टांची ठोकळेबाज वर्गवारी नाही. दोन्ही बाजू आपापल्या परीने प्रामाणिक आहेत. खऱ्या आहेत. लेखकाने दोघांनाही समजून घेतले आहे. समजावून दिले आहे. परंतु त्या संघर्षाची नाटयमय उभारणी करताना कादंबरी कुठेच एकदम मनाला भिडेल अशी झेप घेत नाही.

## कृत्रिम, साचेबंद

ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या यशस्वितेचे आणि तदनुषंगाने रचनेचे आता काही ठोकताळे निर्माण होऊ लागलेले आहे. या ठोकताळ्यांवरून जपून पावले टाकीत ही कादंबरी प्रवास करते. एकतऱ्हेचा साचेबंदपणा, काहीशी संथ कृत्रिमता त्यामुळे आलेली आहे. कादंबरीतल्या संघर्षाला जी अपरिहार्य रचना अभिप्रेत आहे, ती त्यामुळे साधली गेलेली नाही.

ही अपरिहार्य रचना कोणती ? या कादंबरीतील प्रमुख पात्रे आणि त्यांच्यातील भावनांचे तणाव असामान्य आहेत. बाजीराव पेशवे पराक्रमाच्या क्षितिजगामी प्रत्ययाचा सजीव पुतळा. मराठी स्वराज्याला खऱ्या अर्थाने अस्मिता प्राप्त करून देणारा. मस्तानी अप्रतिम सौंदर्याची अद्भुत पुतळी. स्त्रीत्वाचे परिपूर्ण रूप. चिमाजीआप्पा म्हणजे बंधुप्रेमाचा सीमान्त आदर्श. निष्ठेने सावलीसारखा थोरल्या बंधूच्या कर्तृत्वाला बिलगून राहणारा. बाजीराव-मस्तानीची प्रीत जगाच्या चौकटीला बेदरकारपणे झुगारून परस्परात विरून जाण्याची आकांक्षा बाळगणारी, तर चिमाजीआप्पांचा विरोध दौलतीच्या काळजीतून आणि भावावरील निष्ठेतूनच उद्भवलेला आणि स्वार्थाचा लवलेशही नसणारा. सगळेच असामान्य. हे असामान्यत्व उभे करणे हे या कादंबरीचे अपरिहार्य उद्दिष्ट आहे. विशेषणांच्या खैरातीने हे असामान्यत्व साकार होत नाही. त्यासाठी सगळ्या कादंबरीची रचनाच निराळ्या समतोलावर व्हावयास पाहिजे. तिची विविध केंद्रे धगधगीत रेखली जाऊन त्यांच्या-

भोवती आशयाची वर्तुळे तयार व्हावयास हवीत. तशी ती लिहिली न गेल्याने 'श्रीमान योगी' सारखीच गत या कादंबरीची झालेली आहे. कादंबरीचा विस्तार जितसा वाढला, तितकी तिची खोली वाढलेली नाही. कादंबरी पसरट झाली आहे.

कादंबरीच्या पहिल्या भागात बाजीराव, मस्तानी व त्यांची प्रीती यापैकी कशाला काही आकारच येत नाही. कादंबरीची सुरूवातच अत्यंत ढोबळ नि कृत्रिम नाटयमयतेने होते. मूळ कथावस्तूशी ज्याचा काहीही संबंध नाही असा एक भडक प्रसंग अत्यंत नाटकी पद्धतीने सुरुवातीला सांगितलेला आहे. सासवडच्या अत्र्यांची विधवा पत्नी काशीबाईला भेटून पतीच्या अस्थींचे गाठोडे तिच्यापुढे ठेवते आणि तळतळाटाने शाप देते. सुरूवातीलाच कृत्रिमतेने रंगविलला हा प्रसंग कादंबरीच्या प्रवाहाला अगदीच संथ गती देतो. काशीबाई, नाना, राधाबाई, भिऊबाई, अनूबाई यांच्या संभाषणांतून आणि क्रियाप्रतिक्रियामधून बाजीरावांच्या व्यक्तिमत्त्वाची पार्श्वभूमी उभी करावयाची आणि त्यानंतर बाजीरावांचे दर्शन घडवावयाचे अशी योजना दिसते. परंतु वास्तुशांतीच्या समारंभाचे तपशील, आपसातील रुसणीफुगणी, मृत्युंजयाचा अभिषेक, हरणांच्या जोडीचे अपहरण इत्यादीवरच प्रकाशझोत वारंवार वळल्याने ती पार्श्वभूमी विशेष उठावदार झालेली नाही. बाजीरावाच्या लग्नात आलेली कलावंतीण आणि नानाच्या लग्नात आलेली मस्तानी यांच्यामध्ये समांतरपणा जाणवून भिऊबाईला भिती वाटणे, बाजीरावाच्या पत्रात काशीबाईचा उल्लेख न येता मस्तानीला शिधा पाठवण्याची सूचना आवर्जून असणे यासारख्या घटनांतली प्रतिकात्मता अगदीच ढोबळ आहे. "अकरा-बारा वर्षांचं वय" असणाऱ्या नानासाहेबांचे वागणेबोलणे मात्र सोळासतरा वर्षांच्या तरूणासारखे आहे.

## इथे तोलच बिघडतो

पहिल्या बहात्तर पानांमध्ये बाजीराव-मस्तानीच्या प्रेमकथेपैकी कशाचाच आकार मूळ धरत नाही. बाजीरावाला लढाईच्या गर्दीतही मस्तानीकडे शिधा पोचविण्याची आठवण राहणे आणि मस्तानीने मृत्युंजयाच्या अभिषेकाची परवानगी मागणे हे दोन सूचक उल्लेख आहेत. पण इतर सर्व कल्लोळात ते हरवून गेले आहेत. गजाननाच्या मंदिरात हरिणजोडीच्या अपहरणाची तक्रार घेऊन आलेल्या मस्तानीचे रूपसौंदर्य पाहून बाजीराव मोहित होतो. त्यानंतर संकष्टीच्या निमित्ताने मंदिरात मस्तानीचे गायन होते. त्यानंतर पुन्हा विविध राजकारणी प्रसंगांच्या गुंतावळचात हा धागा हरवून जातो आणि बाजीराव-मस्तानीची भेट घडवण्यासाठी सौदागराने आणलेला पंचकल्याणी घोडा उधळून नेमका मस्तानीपाशी बाजीरावाला घेऊन येण्याची अद्भुत कथा लेखकाला रचावी लागते. जन्माष्टमीच्या निमित्तीने मस्तानीचा नाच होतो आणि मग मात्र बाजीरावाला राहवत नाही; आणि त्या बेहोषीत नवरत्नांची अंगठी नावाडचाला देऊन तुफानात नदी पार करून बाजीराव मस्तानीला भेटायला जातो. नायक-नायिकांचे मीलन होते. आतापर्यंत राजकार-

णाऱ्या तोलामोलात आणि प्रतिक्रियांच्या संथ गतीत चाललेली कथा इतक्या विचित्रपणे इथे रोमँटिक बनते की कथेचा सगळा तोलच नाहीसा होतो. इतिहासाचे वस्तुरूप आणि स्वभावदर्शनाचे भारदस्त बारकावे या पातळीवरून अद्‌भुतरम्यता आणि कल्पनारंजन या पातळीवर कादंबरीचा झोका जातो. कादंबरीचा पहिला भाग इथे संपतो.

बाजीरावाची निजामाशी भेट आणि काशीबाई व मस्तानी यांना पुत्रप्राप्ती या महत्त्वाच्या घटना दुसऱ्या भागात आल्या आहेत. दोन्ही भिन्न आघाड्यांवरील घटना. पेशवा, पती व प्रियकर हे बाजीरावाच्या व्यक्तिमत्त्वाचे तीन पैलू उजळणाऱ्या. निजामाच्या भेटीची सार्वत्रिक पार्श्वभूमी आणि प्रत्यक्ष भेटीत दिसलेले पेशवे यांची रचना परस्परपूरक आहे. निजामाच्या भेटीला जाण्याच्या बाजीरावाच्या निर्णयाची प्रतिक्रिया काशीबाई आणि मस्तानी यांच्यावर परस्परविरुद्ध होते. ' मोहिमेवर जाणं वेगळं आणि अशा दगाबाज दुष्मनाची एकट्यानं भेट घेणं वेगळं. कोणत्या वेळी काय होईल त्याचा काही नेम सांगता येतो का ?" असे रडून डोळे सुजवून म्हणणारी काशीबाई आणि ' अस्मानामध्ये उंच गिरक्या घेणाऱ्या गरुडाला विजा कडकडतात म्हणून एखाद्या झाडाच्या ढोलीत बसून राहा असं मी कसं म्हणेन ? आपण निश्चित मनानं जा ' असे आश्वासणारी मस्तानी ही बाजीरावावर जिवापाड प्रेम करणाऱ्या स्त्रीमनाची दोन टोके आहेत. दोघींच्या स्वभावधर्मातला हा फरक आहे. दोघींच्यातील विरोधलयीचे हे चित्रण एक शानदार समतोलपणा उभा करते हे खरे; पण सबंध कादंबरीभर हा छायाप्रकाशाचा खेळ सातत्याने आला की त्यात कृत्रिमता डोकावू लागते; आणि हा समतोलपणा कादंबरीची सेंद्रिय उत्कटता घालवून बसतो.

## काव्यात्म हळुवार चित्रण

उत्सवात नाचायला पेशवे मस्तानीला मना करतात, आणि मस्तानी ही पेशव्यांच्या खास मर्जीतली नाटकशाळा ठरल्याने त्यातऱ्हेने वागण्याचे काही नियम तिला कारकुनाकडून समजावून देण्यात येतात. मस्तानीच्या कुशीत आपला अंश वाढत असल्याचे समजल्यावर बाजीराव आनंदाने उत्कट होतात आणि मस्तानीच्या ओठांवर 'श्रीमंत' या संबोधनाऐवजी 'राऊ' हे लाडके नाव येऊन बसते. मस्तानीसह राऊ मांसाहार करू लागतात. मस्तानीला हवेलीतच आणून ठेवण्याचे ते मनोमन ठरवतात आणि एक खास महाल बांधला जाऊ लागतो. मस्तानीला पुत्र होतो. त्याच्या दर्शनाने राऊ आनंदित होतात आणि ' प्रेमात आणि झुंजात जिद्दीनं समशेर चालवणारा बहाद्दर ' तो व्हावा म्हणून त्याचे नाव समशेरबहाद्दर ठेवतात. या साऱ्या नाजूक गुंफणीतून राऊमस्तानीची प्रेमकहाणी पुढे सरकत राहते. जवळिकीपासून अभिन्नतेपर्यंत मजल मारते. पुन्हा या सगळ्या टप्प्यांना दोन संदर्भ असतात. एक राऊमस्तानीच्या उत्कट प्रेमजिव्हाळ्याचा आणि दुसरा पेशव्यांच्या संबंधीतांच्या

प्रतिक्रियांचा: हे दोन्ही संदर्भ या भागात फार नाजुकपणे व सुंदर रीतीने गुंफलेले आहेत. राऊमस्तानीच्या प्रेमकथेला त्यामुळे एक भावबंध प्राप्त झालेला आहे. विशेषत: या भागातले राऊमस्तानीचे प्रणयप्रसंग फार हळुवार काव्यात्मतेने फुलविलेले आहेत. पण त्यातही 'सेवकांची वर्दळ ऐकू यायला लागली तशी मस्तानीची मिठी सोडून बाजीराव तिथून बाहेर पडले.' यासारखी त्या हळुवार काव्यात्मतेचा गद्य छेद घेणारी वाक्ये आणि 'मोठ्या वृक्षांना सहस्र छिद्रं सहज पाडणाऱ्या भुंग्याला कमलपत्राचा मात्र छेद करता येऊ नये तसं बाजीरावांचं झालं.' यासारख्या शिळ्या चोथट उपमा विरस करतातच.

राऊमस्तानीच्या प्रेमकथेव्यतिरिक्त पेशवेनिजाम भेट, रंगपंचमी, पोर्तुगीजांचा नजराणा, काशीबाईचे माहेरपण, बटक्यांची खरेदी, रामेश्वराची स्थापना, काशीबाईस पुत्रप्राप्ती इतक्या घटना या दुसऱ्या भागात आलेल्या आहेत. त्यांपैकी पेशवेनिज़ाम भेट व पोर्तुगीजांचा नजराणा या घटना पेशव्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू स्पष्ट करणाऱ्या आहेत. काशीबाईचे माहेरपण, रामेश्वराची स्थापना व काशीबाईस पुत्रप्राप्ती या घटना राऊमस्तानीच्या प्रेमकथेला विरोधलयीने गडद करणाऱ्या आहेत. तर रंगपंचमी व बटक्यांची खरेदी या तद्दन अनावश्यक घटना निष्कारण लांबवलेल्या आहेत. कादंबरी पसरट करण्याचे महत्कार्य त्या करतात.

## जमेची बाजू

कादंबरीचा तिसरा भाग काहीसा नाट्यमय आहे. आजारी आपांची चौकशी करणाऱ्या मस्तानीला सहानुभूतिशून्य वागणूक मिळते. बाजीरावाला मद्याच्या नशेची ओळख होते. 'ज्या वेळी, ज्या क्षणी, ज्या कुठल्याही परिस्थितीत तुला असं वाटेल की आमची गाठ घ्यावी, त्या क्षणी या राऊच्या महालाचे, हवेलीचे, राजवाड्याचे दरवाजे तुझ्यासाठी खुले राहतील.' असे वचन बाजीरावाकडून मस्तानीला मिळते. आपांच्या हुकमाने मस्तानी हद्दपार होऊ लागते, पण बाजीराव तिला अर्ध्या वाटेवरून परत घेऊन येतात. चोळीबांगडीसाठी मस्तानीला दोन गावे इनाम देतात. मस्तानी बाजीरावाबरोबर मोहीमेला जाते. मस्तानीची आणि नानांची ओळख होते. दिल्लीवर धडक मारून विजयी पेशवे परत फिरतात. आणि मस्तानी हवेलीत दाखल होते.

बाजीराव आणि आपा यांच्यातील संघर्षाची इथे ठिणगी पडते. दोघांनाही व्यथित करणारा; मनात गाढ प्रेम आणि वर्तनात कठोरपणा आणणारा हा रामलक्ष्मणांचा संघर्ष लेखकाने फार कुशलतेने उभा केला आहे. या कादंबरीचे हे एक यशच आहे. पराक्रमी आणि बेदरकार असे बाजीराव पेशव्यांचे रसरशीत व्यक्तिमत्त्व या तिसऱ्या भागात जिवंतपणे साकार झालेले आहे. या भागात एकच गोष्ट खटकते, आणि ती म्हणजे मस्तानीच्या माहेरासंबंधीच्या भावनांची. धूसरपणा आणि निश्चितपणा यांचे एक चमत्कारिक मिश्रण त्यामध्ये झालेले आहे.

कादंबरीचा चौथा भाग म्हणजे नाटयाचा परमोच्च बिंदू आहे. साताऱ्याला झालेला बाजीरावांचा सत्कार आणि मस्तानीची मानहानी, चार महिने मस्तानीच्या महालात न जाण्याचे बाजीरावांचे वचन आणि अनावर आकर्षणाच्या अगतिकतेने ते झुगारून देण्याची बेहोषी, अशा अनेक परिणामकारक विसंगतीतून बाजीरावाच्या मनावर तीव्रतेचे वळसे चढत जातात. आजारी काशीबाई बाजीरावाच्या हातून औषध घेण्याचे नाकारते. बाजीरावाचे मन ती समजू शकत नाही. उलट तिच्या तडफडाट जाणवत असतानाही बाजीरावाला अगतिकतेला शरण जावे लागते. मस्तानीच्या महालावरचा पहारा कापून काढण्याचे कारस्थान घडते. भर फडावर पेशव्यांची मातुश्रींशी बोलाचाली होते. दिवाळीच्या पाडव्याला बाजीरावाला ओवाळण्याचे काशीबाई नाकारते आणि मस्तानीच्या ओवाळणीत, काशीबाईने प्रेमाने दिलेली नवरत्नांची अंगठी बाजीराव अर्पण करतो. मस्तानी बाजीरावाचे सर्वस्व बनते. जिवाभावाच्या सरदारांच्या वचनाखातर मस्तानीला सोडून बाजीराव मोहिमेला बाहेर पडतो. मस्तानीच्या सौंदर्यावर भाळलेले नानांचे मन मस्तानीच्या मातृप्रेमाच्या चटक्याने ताळ्यावर येते. मस्तानी कैदेतून पळून बाजीरावाकडे येते आणि त्याने दिलेल्या विश्वासावर आश्वासून पुन्हा पुण्याला परतते. अप्पा मस्तानीला कैदेत टाकतात. खचलेल्या मनाने ओढवून घेतलेल्या आजारपणात मस्तानीचा जप करीत बाजीराव कालवश होतात.

यातला प्रत्येक प्रसंग नाट्यमय आहे. एखाद्या चिरेबंदी इमारतीसारखी या चौथ्या भागाची रचना आहे. एकही चिरा ठिसूळ नाही. कच्चा नाही. रंग गडद बनवलेले नाहीत. ते सहज वृत्तीने गडद बनलेले आहेत. विशेषतः प्रत्येक प्रसंगाचा बाजीरावाच्या मनावर उमटणारा आलेख अत्यंत परिणामकारकपणे रेखाटला आहे. बाजीराव मस्तानीच्या ज्या असामान्य उत्कट प्रीतीची कथा सांगण्याची लेखकाची मनीषा आहे, ती असामान्य उत्कटता कादंबरीच्या या शेवटच्या भागात परिपूर्णतेला पोचली आहे.

तथापि संपूर्ण कादंबरीचा एकसंध आकृतिबंध मात्र या असामान्यपणाला तोलून धरणारा नाही. पहिल्या भागापासून शेवटच्या भागापर्यंत क्रमाक्रमाने ही असामान्यता संघटित होत गेलेली आहे; आणि असे तुटक टप्पे जाणवणे हे या कादंबरीचे सामान्यपण आहे. बाजीरावाचे झगझगीत व्यक्तिमत्त्व, मस्तानीची कोमल प्रीत यांचे बहुपेडी चित्रण येथे होत नाही. एकरंगी चित्रण होते. म्हणूनच अनावश्यक पसाऱ्यात गुरफटलेली, असामान्य स्वप्न पुऱ्या ताकदीने पेलू न शकणारी ही असामान्य नसलेली कादंबरी आहे. रंजक आहे, सुघड आहे, पण काहीतरी नवे मनोरे कोरणारी मुळीच नाही. □

'राऊ' : ना. सं. इनामदार : कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे : किंमत पंधरा रुपये.




अजून पहाटेचे पाचही वाजायचे होते. खरे म्हणजे एवढ्या पहाटे सारे सांत्यागो दि क्यूबा हे शहर नेहमी गाढ साखरझोपेत असायचे. परंतु आदल्याच दिवशी कसला तरी स्थानिक उत्सव होता. त्यामुळे २६ जुलै १९५३ च्या त्या पहाटे क्यूबा द्वीपाच्या दक्षिण भागातील त्या छोटयाश्या शहरात अजून थोडी जाग होती. अनेक ठिकाणी रोषणाई होती, नाचगाणी चालू होती, स्पॅनिश-क्यूबन गीते गाईली जात होती. रस्त्यावर रहदारीही होती. पण तुरळक.

त्याच वेळी सव्वीस वाहनांचा एक मोठा ताफा सांत्यागो दि क्यूबाच्या एका रस्त्या-मधून शहराच्या एका मोठ्या चौकाच्या दिशेने सरकत होता. एरवी एवढा मोठा मोटारींचा, ट्रक्सचा ताफा शहरातून यावेळी गेला असता तर भराभरा घरांची दारे-खिडक्या उघडल्या गेल्या असत्या आणि काय आहे म्हणून कुतूहलाने

## एक नवी लेखमाला

**अरुण साधू**




लोकांनी डोकावून पाहिले असते. पण त्या पहाटे लोक एक तर दमून झोपले तरी होते किंवा जल्लोषात मग्न होते.

वाहनांचा तो ताफा ठरलेल्या चौकात आला. तिथे त्याचे तीन भाग झाले. एक एक तुकडी ठरलेल्या दिशेने निघून गेली. शेवटच्या मोटारीतल्या उण्या-पुऱ्या सत्तावीस वर्षाच्या भरदार शरीरयष्टीच्या फिडेल कास्ट्रोने डोळे बारीक करून एकवार सर्व वाहने गेल्याची खात्री करून घेतली आणि मीटवर ठेवलेल्या एका सबमशीनगनवरील आपली पकड अधिकच घट्ट केली व ड्रायव्हरला हुकूम सोडला, चलो—

अवघ्या पावणे दोनशे तरुणांसह आणि त्याहीपेक्षा कमी अशा जुन्यापुराण्या शस्त्रांनिशी फिडेल कास्ट्रो दक्षिण-अमेरिकेतील एका जबरदस्त जुलूमी हुकूमशाहीला वेडरपणे टक्कर द्यायला निघाला होता.

या हल्ल्याचा उद्देश होता सांत्यागोमधील मोंकाडा बराकींवर हल्ला करून ती सर करणे आणि सांत्यागो पासून जवळच असलेल्या बयामो या दुसऱ्याही बराकी ताब्यात घेणे.

हा हल्ला म्हणजे शुद्ध वेडेपणा होता. एवढयाने काही क्यूबाचा हुकूमशाह फुल्जेन्शो बातीस्टा याची लष्करी राजवट एकाएकी उलथून पडणार नाही हे फिडेलला माहीत होते आणि तरीही त्याने तो धाडसी बेत आखला होता. त्याने काही हिशेब केले होते. हल्ल्यात यश पदरी आले तर क्रांतिकारकांना एक प्रचंड नैतिक विजय मिळणार होता. प्रचाराला एक जबरदस्त साधन मिळणार होते. पुढे या बराकींमधून क्रांतीकारकांना

निघून जावे लागेल. पण क्यूबाच्या जनतेला हे दिसून येईल, की मूठभर क्रांतिकारक देखील बाटीस्टाच्या फौजांना भारी आहेत, थोडा धक्का दिला तर ही राजवट सहज कोसळून पडेल आणि पराभव झाला तर या हल्ल्याकडे सर्व देशाचे जे लक्ष वेधले जाईल त्याचेच भांडवल बंडखोरांना करता येईल आणि जनतेत जाणीव निर्माण करता येईल.

हे विचार भलतेच आदर्शवादी आणि स्वप्नाळू होते. पण फिडेल कास्ट्रो स्वत: आदर्शवादी आणि स्वप्नाळू असला तरी आपली स्वप्ने प्रत्यक्षात उतरविण्याची जिद्द त्याच्यात होती आणि कोणत्याही प्रकारे आपले कार्य तडीस जाईलच अशी श्रद्धा होती. या श्रद्धेच्या आणि जिद्दीच्या जोरावरच, तो आपल्या मागे कडवे साथीदार उभे करू शकला होता.

## अत्यंत धाडसी योजना

ही वर वर वेडी, आत्मघातकी आणि निरुपयोगी वाटणारी धाडसी योजना आखायला फिडेल कास्ट्रोला एक वर्ष लागले होते. गुप्त बैठकी होत होत्या. शस्त्रास्त्रे आणि वाहने छुपेपणाने विकत घेतली जात होती. हल्ल्याचे थोडेसे छुपे शिक्षणही दिले जात होते आणि प्रत्यक्ष लढ्याची अगदी बारीक तपशीलवार योजना आखली जात होती. उणे-पुरे पावणे–दोनशे जवान यात सामील होते. दोन तरुणीही होत्या. सारे तिशीच्या आत आणि बहुतेक सगळे पदवीधर. जवळ असलेली घरे-दारे आणि सर्व मोलाच्या चीजवस्तू विकून त्यांनी या हल्ल्यासाठी कष्टाने पैसे उभे केले होते, आणि सगळ्यांनी आपापल्या नोकऱ्यांवर तुळशीपत्र ठेवले होते. सारे पेटले होते, आदर्शवादी होते, समर्पणाची भावना होती, धाडसाचे वेड होते आणि विशुद्ध देश-प्रेमाची ज्वाला त्यांच्या छातीत धगधगत होती.

पंचवीस जुलैला शस्त्रास्त्रे आणि सारी माणसे सांत्यागो जवळच्याच एका पोल्ट्री फार्ममध्ये जमली. सत्तावीस तरुणांना बयामो बराकीवर हल्ला करण्यासाठी पाठविण्यात आले आणि फिडेलच्या नेतृत्वाखाली मोंकाडा वर चढाई करणारी तुकडी सांत्यागो शहराकडे पहाटे निघाली. त्यांच्या अंगावर लष्करी पोशाखच होते. त्यामुळे बराकीकडे जाताना कुणाला त्यांचा संशय आला नसता.

मोंकाडा बराकी सांत्यागो शहराच्या अगदी मध्यभागी होत्या. बराकीच्या प्रवेशद्वारावरील रखवालदाराला ताब्यात घ्यायचे, जवळचे इस्पितळ ताब्यात घ्यायचे, जवळचीच सरकारी मुख्य कचेरी पॅलेस ऑफ जस्टीस, कबजात घ्यायची आणि मग मुख्य बराकीवर हल्ला चढवायचा, अशी योजना होती.

आबेल सांतामारिया, डॉ. मुनोझ, जुलियो त्रिगो हे तरुण आणि नर्सेसच्या वेशात असलेल्या हेडी सांतामारिया आणि मेल्बा हरनान्डेझ या तरुणी यांच्याकडे हॉस्पिटलमध्ये घुसण्याची कामगिरी होती. फिडेलचा धाकटा भाऊ राऊल कास्ट्रो याच्या तुकडीवर पॅलेस ऑफ जस्टीस घेण्याची जबाबदारी होती. खुद्द फिडेल आपल्या तुकडीसकट बराकींवर हल्ला चढविणार होता.

बरोबर सव्वापाचला फिडेलच्या सब-मशीनगन मधून पहिली गोळी सुटली आणि हल्ल्याला तोंड लागले. पण सान्या गोष्टी काही पूर्वनियोजनाप्रमाणे होत नव्हत्या. बंडखोरांची एक मोटार रस्त्यावरून घसरली आणि त्याच वेळी शिपायांचे एक सशस्त्र पथक गार्डरुममधून बाहेर आले.त्यामुळे फिडेलला गोळ्या झाडाव्या लागल्या. बंडखोरांची दुसरी सशस्त्र तुकडी सांत्यागोच्या दुसन्या रस्त्याने येणार होती. पण कुठेतरी ही तुकडी रस्ता चुकली आणि तिला बराकीपर्यंत पोचायला उशीर झाला. या तुकडीजवळ अधिक भारी शस्त्रे होती.

पॅलेस ऑफ जस्टिस आणि हॉस्पिटल सहज ताब्यात आले. पण एकदा गोळ्या सुटू लागल्यावर बराकीतल्या शिपायांनी जोरदार प्रतिकाराला सुरुवात केली. एक दोन बराकीमध्ये बंडखोर घुसून त्यांनी तेथील सैनिकांना कडे केले. पण गोळ्या सुटल्यामुळे शत्रूला एकदम विस्मयचकित करून सोडण्याची संधीच गेली आणि बराकीच्या मधल्या पटांगणात घुसलेल्या बंडखोरांवर चारी बाजूंनी गोळ्यांचा वर्षाव होऊ लागला.

विजयाची संधी गेली असे पाहताच कास्ट्रोने बंडखोरांना माघार घेण्याचा हुकूम दिला. पळावे लागले तर काय करायचे याच्याही योजना तयार होत्या. बंडखोरांनी आपल्या साध्या कपड्यांवरच लष्करी पोशाख चढविले होते. पळता पळता त्यांनी आपल्या अंगावरचे लष्करी पोशाख काढून टाकले. काहीजण जवळच्याच इस्पितळात लपले. काही सांत्यागो मधल्या आपल्या मित्राकडे पळाले तर काही थेट गावाबाहेर जाऊन जवळच्या पहाडी प्रदेशात घुसले.

हॉस्पिटलमध्ये शिरलेल्यांवर लवकरच पश्चातापाची पाळी आली. बँडेजेस वगैरे बांधून काही बंडखोरांनी रिकाम्या कॉटस्‌वर अंग टाकले होते. हल्ला होऊन गेल्यावर थोड्याच वेळात सैनिकांचे तपासणीपथक आले. आत कुणी बंडखोर नाही याची खात्री करून घेऊन ते बाहेर पडणार एवढ्यात हॉस्पिटलमधल्या एका पोऱ्याने चुगली केली, आणि सगळ्यांना पकडण्यात आले. वीस बंडखोर आणि दोन्ही नर्सेस पकडल्या गेल्या. बंडखोरांना हात बांधून बाहेर नेण्यात येऊ लागले. एका सैनिकाने अगदी सहज डॉ. मुनोझच्या पाठीत गोळी झाडली. डॉ. मुनोझ कोसळला.

सांत्यागो दि क्यूबा शहरात ठिकठिकाणी जे लोक लपले होते त्यांनाही एकेक करून शोधून काढण्यात आले. हल्ल्यामध्ये ठार झालेल्या एकेका सैनिकाच्या बदल्यात दहा-दहा बंडखोरांना भयंकर हाल हाल करून ठार मारण्यात आले. तीन बंडखोर हल्ल्यात ठार झाले होते. अडुसष्ट जणांना पकडल्यानंतर लगेच हाल हाल करून मारले आणि बत्तीस बंडखोर तुरुंगातल्या हालाने मेले, आणि फक्त पन्नास शिल्लक उरले.

सुमारे चाळीसएक बंडखोर फिडेल कास्ट्रो बरोबर सिएरा मेस्त्राच्या पहाडीत

शिरले होते. डोंगरांमधून आणि जंगलांमधून लढा चालूच ठेवण्याचा फिडेलचा इरादा होता. पण बरेच बंडखोर निराश झाले होते. वीसजणांनी शरण जायचे ठरविले. उरलेल्यांनी फिडेलबरोबर पहाडीत एक आठवडा अन्न-पाण्याविना काढला. हळूहळू तुकड्या तुकड्यांनी भोवतालच्या सैनिक साखळ्यांमधून थकलेले बंडखोर बाहेर तरी पडू लागले किंवा शरण येऊ लागले. अखेर फिडेलबरोबर दोघेच साथीदार उरले.

हे तिघेजण भयानक थकलेल्या अवस्थेत पडलेले असताना सैनिकांच्या एका पथकाने त्यांना गराडा घातला. पथकाचा नेता होता लेफ्टनंट सारिया. हा प्रामाणिक सैनिक होता. या वेळपर्यंत बंडखोरांवर सैनिकांनी जे अत्याचार केले होते, जे रक्त वाहविले होते, त्याचा सर्व क्यूबाभर तीव्र निषेध होत होता. जिकडे तिकडे शूर बंडखोरांचा मोंकाडावरील हल्ला आणि सैनिकांचे बंडखोरांवरील क्रूर आणि निर्घृण अत्याचार यांचीच चर्चा होत होती. लेफ्टनंट सारियाला हे सगळे नापसंत होते. खरे पाहता फिडेल सापडेल तेथे त्याला जागच्या जागी ठार मारण्याचे गुप्त हुकूम होते. पण सारियाने आपण जणू फिडेलला ओळखलेच नाही असे दाखविले आणि त्याचे हात बांधून त्याला अटक केली. फिडेलचा प्राण वाचला.

परंतु हल्ला अयशस्वी झाला होता. अर्ध्याहून अधिक बंडखोर ठार मारले गेले होते. उरलेले तुरुंगात तरी होते किंवा भूमिगत तरी होते. बाटीस्टाच्या सैन्याचा आणि गुप्तपोलीसांचा पाश क्यूबन लोकांच्या मानेभोवती अधिकच घट्ट आवळला जात होता. सैनिकांच्या निर्घृण अत्याचारांमुळे सर्वसाधारण जनतेची सहानुभूती साहजिकच बंडखोरांकडेच होती. पण नुसत्या सहानुभूतीचा काय उपयोग ? बंडखोरांचा नेता फिडेलही तुरुंगात होता.

असा सर्वत्र अंधःकार होता. कोणत्याही क्रांतिकाराला पूर्ण निराश आणि हतबल करणारा हा क्षण होता. आता त्यांच्यापुढे काय भविष्य होते ? तुरुंगवास किंवा मृत्यू.

## विजयाची मुहूर्तमेढ

पण फिडेल कास्ट्रो हा एवढ्याने हरणारा तरुण नव्हता. ‘मोंकाडा’चा पराभव त्याने पचविला. एवढेच नव्हे तर या पराभवाचेच प्रचंड भांडवल करून त्यावर आपल्या क्रांतीच्या भावी विजयाची जोमदार मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर अवघ्या साडेसहा वर्षांच्या आत फिडेल कास्ट्रोने क्रांतीकारकांचा विजयी नेता म्हणून मोंकाडा बराकीमध्ये भाषण केले तेव्हा तो क्यूबाचा सर्व सत्ताधीश होण्याच्या मार्गावर होता. मोंकाडा बराकींना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले होते आणि सहव्वीस जुलै या दिवसाभोवती अनेक काव्ये गुंफली गेली होती. कास्ट्रोने आपल्या चळवळीचे नावच सहव्वीस जुलै चळवळ असे ठेवले होते. मोंकाडा हा तर क्रांतीकारकांचा परवलीचा शब्द झाला होता. त्या नावात एक वेगळीच जादू आणि सामर्थ्य निर्माण झाले होते. दक्षिण अमेरिकेतील जुलूमी, दहशतवादी राजवटींना

उलथून पाडण्याची स्वप्ने पाहणाऱ्या ठिकठिकाणच्या क्रांतीकारकांना मोंकाडा हे एक नवे श्रद्धास्थान, प्रतिक निर्माण झाले होते. अंधःकारातही दिशा दाखविणाऱ्या ध्रुव ताऱ्यासारखे, निराशमय परिस्थितीतही उत्साह निर्माण करणारे. पराभवाचे एवढे नाट्यमय तेजस्वीकरण दुसरीकडे कुठे झाले नसेल.

परंतु ' मोंकाडा 'चे महत्त्व तसे आहे. फिडेलच्या हाती अपयश आले होते खरे. पण या पराभवातच त्याने आपल्या भावी विजयाची बीजे पेरली. मोंकाडाने क्यूबाला एक जबरदस्त धक्का दिला. जुलुमी राजवटीबद्दल अगोदरच जनतेमध्ये असलेला सुप्त तिरस्कार जागा होऊन त्याला प्रखर स्वरूप प्राप्त झाले. वेगवेगळे विरोधी पक्ष आणि क्रांतीची प्रेरणा असलेले तरुण या धक्क्याने आळसावून जागे होऊन खडबडून उठले आणि क्रांतिकार्याला, गनिमी युद्धाला क्यूबाची भूमी सुपीक झाली.

मोंकाडाला महत्त्व आले ते ज्या उद्दिष्टांमुळे हल्ला केला ते पुढे सफल झाले म्हणून. नाहीतर इतर अनेक क्रांतीवेडया तरुणांच्या आत्मघातकी धाडसांप्रमाणे हीही बाब केव्हाच इतिहास जमा होऊन नगण्य झाली असती. पण कास्ट्रोने हे दाखवून दिले की लोकांची तयारी असो वा नसो, क्रांतीकारकांमध्ये जिद्द आणि हिंमत असली तर ते जुलूमी राजवटीचा पाडाव करू शकतात. ज्यांची क्रांतीवर श्रद्धा आहे त्यांनी योग्य परिस्थिती निर्माण होण्याची वाट बघत स्वस्थ बसण्याची गरज नाही. जुलूमी राजवटीखालची जनता ही वाळलेल्या गवताप्रमाणे क्षीण आणि सत्ताहीन असते. पण क्रांतीकारकाची एक पेटलेली काडी त्या जनतेला पेटवून उठते. हे क्यूबाने दाखवून दिले.

खरे म्हणजे क्यूबा हे तसे लहानसे बेट. फिडेल कास्ट्रोच्या क्रांतीपर्यंत क्यूबा जगाच्या खिजगणतीतही नव्हते. लॅटिन अमेरिकेतील इतर सर्व देशांप्रमाणे तेथेही अधून मधून लष्करी बंडे होऊन हुकूमशाह बदलत होते. पण राजवटीचा कणा लष्करी हुकूमशाही हाच राहात होता. कास्ट्रोने ते बदलले म्हणून क्यूबाला महत्त्व प्राप्त झाले. लॅटिन अमेरिकेतील एवढेच नव्हे तर सर्व जगातील पददलित राष्ट्रांतील हुकूमशाही, जुलुमी राजवटी उलथून पाडण्याचा नवा क्रांतीमार्ग कास्ट्रो आणि त्याचा साथी चे गव्हेरा यांनी दाखविला. म्हणून क्यूबाला महत्त्व प्राप्त झाले. लॅटिन अमेरिकेतल्या अनेक राष्ट्रांमध्ये अजूनही बाटीस्टासारखी हुकूमशाही लोकांच्या उरावर आहे. त्या लोकांना क्यूबा हेच आशास्थान आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात क्यूबाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले ते या नव्या राष्ट्राच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वामुळे हे तर खरेच. पण त्याचबरोबर १९६२ च्या ऑक्टोबर मध्ये क्यूबावरूनच अमेरिका आणि सोविएत रशिया या दोन राष्ट्रांनी जगाला अणूयुद्धाच्या टोकावर नेले होते.त्यामुळेही जगाचे क्यूबावर लक्ष केंद्रीत झाले. त्याच वेळी भारत-चीन सीमायुद्ध पेटत होते. पण सारे जग श्वास रोखून बघत

होते ते क्यूबाकडे. फक्त बटने दाबण्याचाच अवकाश की एक महासंहारक अणुयुद्ध जगावर कोसळून पडणार होते. पुढे रशियाने माघार घेतली, अणूयुद्ध टळले. क्यूबाने आपले स्वातंत्र्य अबाधित राखले. अमेरिका, रशिया आणि चीन या तिन्ही बलाढ्य राष्ट्रांना दोन हात दूर ठेवून आपला स्वतःचा वेगळा असा आदर्शवादी मार्ग क्यूबा राखीत आहे.

## फिडेल, चे – नव्या युगाचा अविष्कार

अमेरिका, लॅटिन अमेरिका, युरोप आणि आफ्रिकेतील नव्या डाव्या विचारसरणीच्या तरुणांना फिडेल कास्ट्रो आणि चे गव्हेरा हे आदर्श, रोमँटिक क्रांतीकारकांचे प्रतीक वाटतात. नव्या युगाच्या आशा आकांक्षाचे आणि दबलेल्या शक्तींचा अविष्कार म्हणजे फिडेल आणि चे असे त्यांना वाटते. दाढचा आणि कस वाढविणे, नैसर्गिक वागणूक, सामाजिक बंधनांना झुगारून देण्याची बंडखोर प्रवृत्ती, जुलूमाचा रक्तमय, हिंस्त्र प्रतिकार ही आताच्या युगाची वैशिष्टचे फिडेल आणि चे यांच्यापासून सुरू झाली असे म्हणायला हरकत नाही. अखेर फिडेल आणि चे निर्माण झाले ते नव्या काळाच्या लाटांमधूनच. ज्यामधून लांब केसांचे तरुण आणि मिनी स्कर्ट घालणाऱ्या तरुणी आल्या, हिप्पीज निर्माण झाले, ब्लॅक पॉवरचे पुरस्कर्ते आणि गनिमी सैनिक आले त्याच युगाचा अविष्कार म्हणजे फिडेल आणि चे.

चे गव्हेरा हा मूळचा अर्जेंटीना मधील. पण फिडेल कास्ट्रो आणि चे ही संपूर्ण क्यूबन इतिहासाची परिणत निर्मिती आहे असे मानले जाते. क्यूबामधील स्वातंत्र्ययुद्धे १८६८ पासून सुरू झाली ती शेवटपर्यंत वेगवेगळ्या स्वरूपात चालूच राहीली. त्यांचाच परिपाक म्हणजे फिडेल कास्ट्रो आणि त्याची क्रांती.

फिडेल कास्ट्रोने क्यूबाला एक नवे स्वरूप दिले आहे. नव्या पिढीचा बंडखोरपणा त्याने लॅटिन अमेरिकेला दिला. वयाच्या बत्तीसाव्या वर्षी त्याच्या हाती सत्ता आली आणि त्याने आपला ठसा सबंध लॅटिन अमेरिकेवर उमटविला. जगभर मान्यता आणि प्रसिद्धी मिळालेला लॅटिन अमेरिकेतील पहिला पुरुष म्हणजे फिडेलच !

अमेरिकेच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे ते राष्ट्र ठिकठिकाणच्या जुलूमी हुकूमशाही राजवटींना स्थैर्यांच्या आणि कम्युनिस्ट विरोधाच्या नावाखाली भरपूर मदत करीत असते. त्यानुसार अगदी शेवटपर्यंत अमेरिकेने हुकूमशाह फुल्झेन्शो बाटीस्टा याला आणि त्याच्या भ्रष्टाचारी राजवटीला क्यूबात पाठिंबा दिला. भौगोलिक, राजकीय आणि लष्करी दृष्टचा क्यूबा हे अमेरिकेच्या दृष्टीने मोठ्या मोक्याच्या ठिकाणी वसलेले आहे. त्यामुळे अमेरिकेला क्यूबा सतत आपल्या अंकित हवे होते. फिडेलचा क्यूबात विजय झाल्यावर अमेरिकेने त्याला पाडण्याचे हर तऱ्हेचे प्रयत्न केले. उठाव आणि बंडखोरांची आक्रमणे घडवून आणण्याचे प्रयत्न केले. परंतु क्यूबा स्वतंत्रच राहिले. अमेरिकेच्या डोळ्यात खुपत राहिले.

क्रांतीनंतर तीन वर्षांनी फिडेल कास्ट्रोने आपले सरकार सोशालिस्ट असल्याचे घोषित केले आणि साम्यवादाला देशात अधिकृत पाचारण केले. त्याबरोबर क्यूबा

रशियाची वसाहत झाल्याची अमेरिकेत टीका होऊ लागली. पण आपला मार्ग स्वतंत्र असल्याचे फिडेल कास्ट्रोने वेळोवेळी प्रत्यक्ष आपल्या कृतीने दाखवून दिले आहे. कास्ट्रोचा साम्यवाद हा क्यूबन किंवा लॅटिन अमेरिकन साम्यवाद आहे. आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीशी त्याचा काही संबंध नाही. हुकूमशाही, जुलूमी आणि पक्षपाती राज्यकारभाराने कोणत्याही पददलीत देशामध्ये जनतेची जी हलाखीची परिस्थिती निर्माण होते ती सुधारण्यासाठी आणि देशाला पुढे नेण्यासाठी अपरिहार्यपणे जो एकमेव मार्ग पत्करावा लागतो तो कास्ट्रोने पत्करला.

## क्यूबा असा होता

इतर सर्व लॅटिन अमेरिकन देशांप्रमाणेच कास्ट्रो यायच्या आधी क्यूबामधील सामान्य जनतेची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. कास्ट्रोच्या आधीचा क्यूबा कसा होता ?

सुमारे साडेचारशे वर्षांपूर्वी ख्रिस्टोफर कोलंबसने क्यूबन द्वीपाच्या हिरव्यागार किनाऱ्यावर प्रथमच नजर टाकली तेव्हा त्याने लिहिले, 'माणसाने आतापर्यंत पाहिलेल्या बेटांमधील अत्यंत सुंदर असे हे बेट आहे.' हिरवेगार ऊस निर्माण करणारी क्यूबाची सुपीक जमीन हीच त्या देशाची सर्वात मोठी संपत्ती आहे. क्यूबा म्हणजे सर्व जगाचा साखरेचा मळा आहे. जगातल्या सर्वोत्कृष्ट सिगार्स क्यूबन तंबाखूपासून तयार होतात. क्यूबामधील निकेलचा साठा हीही एक मोठी संपत्ती आहे. पण या सगळ्या संपत्तीचा खुद्द क्यूबन जनतेला कधीच उपयोग होत नव्हता.

क्यूबामध्ये स्थायिक होणारे पहिले युरोपियन्स म्हणजे स्पॅनिशच. पंधराव्या शतकाच्या शेवटास स्पॅनिश लोकांनी जवळजवळ एक तृतियांश दक्षिण अमेरिका आणि संपूर्ण मेक्सिको आपल्या वसाहतीखाली आणले. दक्षिण अमेरिका म्हणजे नवे जग होते.

क्यूबा स्पॅनिश अमलाखाली सुमारे चारशे वर्षे होते. दक्षिण अमेरिकेतील इतर स्पॅनिश वसाहती एकामागून एक स्वतंत्र होत होत्या. पण शेवटपर्यंत स्पॅनिश अंमलाखाली राहिला तो क्यूबाच. स्पॅनिश अमलाखालील ही चारशे वर्षे म्हणजे क्रूरता, रक्तपात, नासधूस आणि गैरकारभार यांचेच साम्राज्य होते. या चारशे वर्षांच्या काळात जवळजवळ सर्व स्थानिक रेड इंडियन जमातींची वंशहत्त्या झाली. उरले ते स्थायिक झालेले स्पॅनिश, निग्रो आणि त्यांच्या वर्णसंकरातून निर्माण झालेले.

स्वातंत्र्याचे वारे जेव्हा लॅटिन अमेरिकन उपखंडात निर्माण झाले तेव्हा क्यूबन देशभक्तांनीदेखील स्पॅनिश वसाहतवादाविरुद्ध लढे उभारण्यास सुरुवात केली. अमेरिकेचे या लढ्यांवर लक्ष होते. कारण बरेच मोठे अमेरिकन भांडवल क्यूबामध्ये गुंतू लागले होते. स्पेनची राजवट अकार्यक्षम आणि नालायक होती त्यामुळे

अमेरिकेचे फावत होते. परंतु त्यामुळेच क्यूबामधील घटनांकडे अमेरिकन सरकार डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवीत होते.

स्वातंत्र्य मिळविण्यासाठी क्यूबन लोकांना भयानक त्याग करावा लागला. एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच लोकांच्या चळवळी सुरू झाल्या होत्या. खरे नागरी युद्धाला तोंड लागले ते १८६८ मध्ये. सुमारे दहा वर्षे ही हिंस्त्र चळवळ चालू होती. त्यात सुमारे ८० हजार स्पॅनिश सैनिक आणि चार लाख क्यूबन नागरिक मृत्यूमुखी पडले. अमेरिकेने या युद्धात भाग घेतला नाही. पण स्पॅनिश सैन्याला शस्त्रास्त्रांची भरपूर मदत केली खरी. अखेर दहा वर्षांनंतर हे बंड दडपून टाकण्यात आले.

## पहिली ठिणगी पडली

परंतु लोकक्षोभ खदखदत होताच. या असंतोषाला तोंड फोडले फिडेल कास्ट्रो ज्याचा वारसा सांगतो त्या जोझे मार्टीने १८९५ साली. देशातल्या बुद्धीवाद्यांना आणि लहान शेतकऱ्यांना व मजुरांना एकत्र करून मार्टीने नवे बंड उभारले. सार्वत्रिक हरताळ, संप, सशस्त्र लढे आदी सर्व मार्ग क्यूबन जनतेने हाताळले. स्पॅनिश राजवटीनेही तेवढ्याच तडाख्याने उत्तर देऊन लाखो क्यूबनांना कॉन्सेन्ट्रेशन कँपस्‌मध्ये कोंडले. हजारो भुकेने तडफडत मेले. हे नागरी युद्ध चालू असताना अमेरिकेने अलिप्ततेचा पवित्रा घेतला होता. आणि जेव्हा नागरी युद्धाने स्पॅनिश राजवट कोसळणाच्या बेताला आली होती तेव्हाच अमेरिकेने हस्तक्षेप केला. आणि स्पेनचा १८९८ मध्ये पराभव करण्याचे श्रेय घेतले.

फिडेल म्हणतो, 'अमेरिकन साम्राज्यवादाचा इतिहासच तसा आहे. स्पॅनियार्ड जेव्हा अगदी पराभवाच्या कड्यावर आले होते तेव्हा कुठे हे अमेरिकन्स् गळून पडलेले पिकलेले आंबे झेलायला पुढे आले.'

पुढे जेव्हा स्पेन आणि अमेरिका यांच्यात या युद्धानंतर तह झाला, तेव्हा त्याला एकाही क्यूबन प्रतिनिधीला बोलावले नव्हते. हजारो क्यूबनांनी या लढाईत प्राण गमावले. पण अमेरिकन पुस्तकात या युद्धाचे वर्णन मात्र 'स्पॅनिश–अमेरिकन युद्ध' असेच. तीन वर्षाच्या या युद्धात अमेरिकनांचा हस्तक्षेप अवघ्या तीन महिन्यांचा. सुमारे २,५०० अमेरिकन सैनिक या युद्धात मेले. त्यातले बहुतेक रोगराईने. आणि तरीही विजयाचा मलिदा अमेरिकेला.

क्यूबामध्ये अमेरिकाविरोधी भावना कशी निर्माण होऊ लागली हे यावरून दिसून येईल. अमेरिका आणि स्पेन यांच्यात पॅरिसला परस्पर तह झाला आणि क्यूबावरील आपला हक्क स्पेनने सोडला. 'आम्ही नव्वद वर्षे लढलो, फासावर चढलो, गोळ्या झेलल्या, लाखांनी मेलो, बंडे केली. त्या सगळ्यांचे हे बक्षीस!' हे त्या वेळच्या क्यूबन तरुणांचे विचार.

या तहानंतर अमेरिकेने एका जनरलला क्यूबाचा गव्हर्नर म्हणून नेमले. अर्थात

त्याला नेमताना एकाही क्यूबन प्रतिनिधीला एका शब्दानेही विचारले नव्हते.

अमेरिकन सैनिकी देखरेखीखाली सप्टेंबर १९०० मध्ये घटना समितीवर सदस्यांची निवडणूक घेण्यात आली. ही घटना तयार होत असताना अमेरिकेने ती मधे अशी एक मख्खी मारून ठेवली की त्यामुळे क्यूबामधील अमेरिकन हितसंबंधांचे कायमचे रक्षण व्हावे. घटना समितीला अमेरिकन गव्हर्नरनेच सुचविले की, क्यूबा आणि अमेरिका यांच्यातील संबंध कसे असावे हे सांगणारी तरतूद या घटनेत असावी. त्यानुसार 'क्यूबाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी' आणि इतर अनेक कारणांसाठी अमेरिकन सरकारला हस्तक्षेप करण्याचा अधिकार देण्यात आला. आणि त्यासाठी अमेरिकन नौदलाकरता योग्य त्या जागा राखून ठेवण्याचीही तरतूद करण्यात आली.

## अमेरिकेची वसाहत

क्यूबाला जवळजवळ अमेरिकन वसाहत करून टाकणाऱ्या या तरतूदीला क्यूबनांनी कसून विरोध केला. पण त्याचा उपयोग झाला नाही. आणि अपरिहार्यपणे क्यूबावर अमेरिकेचा वरदहस्त घट्टपणे बसला. ही तरतूद पुढे १९३४ मध्ये घटनेतून काढून टाकण्यात आली. पण तोवर कैक वेळा अमेरिकन लष्कराने क्यूबामध्ये हस्तक्षेप केला होता. त्यामुळे १९०० साली घटनात्मक दृष्टचा जरी क्यूबा स्वतंत्र झाला तरी तेथील देशभक्तांना क्यूबाचे स्वामीत्व स्पेनकडून अमेरिकेकडे गेले असेच वाटले.

घटनेनुसार क्यूबातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुका १९०२ साली झाल्या आणि तोमास एस्त्रादा पामा हा क्यूबाचा पहिला अध्यक्ष झाला. त्यानंतर जे अध्यक्ष झाले त्यापेक्षा पामा बराच प्रामाणिक होता. पण येथपासूनचा क्यूबाचा सारा इतिहास भ्रष्टाचार, जुलूमशाही, बंडे आणि रक्तपात यांनी भरलेला आहे. त्याचबरोबर अमेरिकन भांडवलदारांच्या वाढत्या प्रभावानेही या काळात क्यूबा दबून गेला होता. मरून पडलेल्या जनावरावर गिधाडांनी चारी बाजूने झडप घालावी त्याप्रमाणे अमेरिकन भांडवलदारांनी क्यूबाच्या सुपीक जमिनीवर धाडी घातल्या. स्वस्तात जमिनी विकत घेऊन त्यावर प्रचंड ऊसाचे, कॉफीचे, तंबाखूचे मळे उभारले आणि क्यूबन शेतकऱ्याला मजूर करून सोडले.

राजकारणात भ्रष्टाचार आणि अर्थकारणात अमेरिकन भांडवलदारांचे वर्चस्व हे क्यूबाचे सूत्र झाले. मोठमोठ्या अमेरिकन कंपन्यांनी क्यूबात जमिनी विकत घेण्याचा सपाटा लावला. बऱ्याच ठिकाणी जबरदस्तीने जमिनी विकत घेतल्या गेल्या. वीसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात क्यूबन शेतकऱ्याचे दोनच वर्ग उरले. बडे जमीनदार, जे बड्या अमेरिकन कंपन्यांना जमिनी विकण्यास नकार देऊ शकत होते, आणि शेतमजूर–अमेरिकन साखर कंपन्यांमध्ये वर्षांतून काही महिने काम करणारा आणि एरवी बेकार राहणारा.

क्यूबावरील अमेरिकन आर्थिक पकड केवळ साखरेपुरतीच मर्यादित नव्हती तर इतरही क्षेत्रात अमेरिकन भांडवलदार आपले पाश क्यूबाभोवती घट्ट आवळू लागले होते. क्यूबामधील टेलिफोन आणि वीजनिर्मिती वाटप संपूर्णपणे अमेरिकनांच्या ताब्यात होते. या दोन क्षेत्रात ९० टक्के भागीदारी अमेरिकन भांडवलदारांची झाली. आणि रेल्वेमध्ये ५० टक्के. तांब्याच्या खाणी, पर्यटन–उद्योग हेही अमेरिकानांच्या मुठीत होते.

अमेरिकन हस्तक्षेपानंतर अवघ्या दोन–तीन दशकात ही परिस्थिती निर्माण झाली. म्हणजे स्पॅनिश राजवटीची पिळवणूक जाऊन त्या जागी अमेरिकन भक्षक आले.

क्यूबामधील वरचा श्रीमंत वर्ग या प्रक्रियेला मदतच करीत होता. अमेरिकन भांडवलदारी कंपन्या सोडल्यास अवघ्या एकोणीस श्रीमंत क्यूबन कुटुंबांच्या मुठीत क्यूबाचे अर्थकारण होते. क्यूबन राजवट भ्रष्टाचारी आणि अस्थिर. त्यामुळे क्यूबन व्यापारी आणि उद्योगपती भराभरा प्रचंड नफे कमाविण्याच्या मागे होते. मिळणारा नफा एक तर ते परकीय बँकांमध्ये टाकीत किंवा दडपून तरी ठेवीत. सरकारी कायदेकानू आपल्या फायद्याच्या बाजूने करून घेण्यास त्यांना काहीच अडचण पडत नसे. प्रचंड प्रमाणावर जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करून त्या स्वस्तात विकणे ही अमेरिकन पद्धती क्यूबात नव्हती.

करपद्धतीच अशी होती, की तीमध्ये श्रीमंतांना खूपच सूट मिळत असे. एवढे असूनही कर बुडविण्याची प्रवृत्ती काही कमी नव्हती. वैयक्तिक उत्पन्नांवर तर नाममात्र कर होते. त्यामुळे श्रीमंत क्यूबन अमेरिकन कोटयाधीशांपेक्षाही चैनीत आणि विलासात राहू शकत होते.

हे अगदी खरे आहे, की अमेरिकन भांडवलाच्या गुंतवणुकीशिवाय क्यूबाची आर्थिक प्रगती झाली नसती. वीसाव्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकन सरकारने आपल्या भांडवलदारांना क्यूबात भांडवल गुंतविण्यास उत्तेजन दिले, त्यामागे क्यूबाची आर्थिक प्रगती व्हावी, हा उद्देश होताच. पण अखेर व्यापार तो व्यापार. व्यापाऱ्यांची दृष्टी नफ्याकडेच असणार. भरमसाट नफ्याच्या प्रवृत्तीमुळे स्थानिक लोकांवर अन्याय होत आहे, असा उदात्त विचार व्यापाऱ्यांच्या मनात कसा येणार?

तेव्हा अशा रीतीने आर्थिक विषमतेची दरी वाढत होती. एकीकडे गुलामासारखे काही महिने राबून मग बेकार राहणारे भूमिहीन शेतमजूर तर दुसरीकडे सुखविलासांमध्ये अमेरिकन कोटयाधिशांपेक्षाही वरताण करणारे धनाढ्य असे क्यूबन उद्योगपती व व्यापारी. उत्पादनाच्या आणि नैसर्गिक संपत्तीच्या दृष्टीने क्यूबा खरे म्हणजे सधन राष्ट्र होते. पण राहणीमानामध्ये अशी भयानक तफावत होती.

क्रांतीची बीजे रुजण्यास यापेक्षा सुपीक जमीन कोणती ? भयानक आर्थिक व सामाजिक विषमता, खालच्या आणि वरच्या वर्गांच्या राहणीमानांमधली आ

वासणारी आणि सतत वाढत जाणारी दरी, खालच्या वर्गाची बेफाट पिळवणूक, जीवघेणी बेकारी, नालायक अस्थिर सरकारची भयानक अकार्यक्षमता आणि निर्लज्ज भ्रष्टाचार, सभोवती दिसणाऱ्या अतीव दारिद्र्यामुळे तरुणांत वाढणारी विफलता, साध्या गोष्टींमध्येही न्यायाला मिळणारा फाटा यापेक्षा क्रांतीला अनुकूल अशी आणखी कोणती परिस्थिती हवी ?

त्यामुळे सामाजिक अन्यायाची चीड असणारे ध्येयवेडे तरुण ठिकठिकाणी एकत्र येऊन, अन्यायी राजवट उलथून पाडून न्यायाची प्रस्थापना करणारी राजवट आणण्याची भाषा करू लागले. पूर्वी स्पॅनिश साम्राज्यवादापासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बंडे होत. आता आर्थिक दास्यातून मुक्त होण्यासाठी क्रांतीची भाषा होऊ लागली. अगदी पहिला उठाव झाला १९०६ साली. अध्यक्ष पामा याने तो अमेरिकन मदतीने दडपून काढला. पुन्हा पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती होत राहिली. उठाव व्हावा, क्यूबन अध्यक्षाने अमेरिकन सैन्याला पाचारण करावे आणि तो दडपून काढावा. पहिल्यापेक्षा दुसरा क्यूबन अध्यक्ष अधिक भ्रष्टाचारी निघावा. मागच्यापेक्षा पुढच्या अध्यक्षाने परकीय बँकात अधिक पैसे भरून ठेवावेत अशी साखळी चालत राहिली. विरोधी पक्षोपक्षांचे नेतेही अध्यक्षाने चारलेल्या मलीद्यावर खूष राहू लागले. राजकीय पक्षदेखील भ्रष्टाचाराची आगरे बनली.

राजकारणातील बेशरम भ्रष्टाचारामुळे राजकीय क्रांतीची दारे बंद झाली होती. शांततामय मार्गाने ही पद्धती बदलणे शक्य नाही हे स्पष्ट दिसत होते. सारे राजकीय पक्ष अध्यक्षांच्या आणि अमेरिकन उद्योगपतींच्या खिशात जाऊन बसत होते तर ते काय बोडख्याचे परिवर्तन करणार ?

शांततामय, लोकशाही मार्गाने सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची दारे जेव्हा बंद होतात तेव्हाच अन्यायाची चीड असणारे ध्येय निष्ठ तरुण दुसरे मार्ग शोधू लागतात. आणि दुसरा मार्ग म्हणजे बंदुकीची नळी.

ही नवी जाणीव जेव्हा क्यूबन विद्यार्थ्यात निर्माण झाली आणि ते वाढत्या प्रमाणात शस्त्रे हाती घेऊ लागले, त्याच सुमारास १८९५ च्या स्वातंत्र्य युद्धात शहीद झालेल्या जोझे मार्तीच्या स्वातंत्र्यविषयक विचारांचा पगडा तरुणांच्या मनावर बसला. क्यूबन इतिहासातील उदात्त, सर्वश्रेष्ठ आणि भव्य विचारसरणीचे प्रतिक म्हणून जोझे मार्ती मानला जाऊ लागला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हिंस्र चळवळींना जोझे मार्तीच्या आदर्शवादाची नवी स्थिर आणि उदात्त बैठक प्राप्त झाली.

या नव्या राजकीय आदर्शवादाच्या लाटा क्यूबन द्वीपकल्पावर वाहू लागल्या असतानाच क्यूबन क्षितीजावर फिडेल कास्ट्रोचा सहजपणे उदय झाला. क्यूबाच्या सुपीक जमिनीत सहजपणे ऊस उगवतो तसा.

[ क्रमशः ]

खुलासा केला होता. तरीही बाईंनी उपोषण केले. श्रीमती सुशीला पटेल यांनी त्यांना पाठींबा देऊन काय साधले कोण जाणे ?

सुमारे नऊ महिन्यापूर्वी श्री. पटेल यांनी घटस्फोट घेतला. शिवाय त्यांचे पूर्वायुष्य, राजकीय विचार यांची साऱ्यांना पूर्ण कल्पना होतो. अशा वेळी, चार महिन्यांपूर्वी मुंबई प्रदेश काँग्रेस समितीचे ते जेव्हा अध्यक्ष झाले त्या वेळीच त्यांच्या नेमणूकीविरुद्ध उपोषणे वगैरे करण्याचे अथाईडबाई किंवा त्यांच्या विचाराच्या मंडळींच्या मनात का आले नाही ? असा प्रश्न उपस्थित होतो. तेव्हा काही विशिष्ट हेतू समोर ठेवून काही हितसंबंधी मंडळींनी उपोषणासाठी श्रीमती अथाईड यांचे प्यादे पुढे सरकवले ही वस्तूस्थिती आहे.

## चुकीचा पायंडा

अनेक काँग्रेस जनांशी बोलताना असे आढळले, की अथाईडबाईंनी रजनीभाईंवर केलेले आरोप शंभर टक्के खरे आहेत, यावर त्यांचाही ठाम विश्वास आहे पण ज्या पद्धतीने ते आरोप केले गेले वा हे प्रकरण पुढे आणले गेले ती पद्धत त्यांना नामंजूर आहे. पटेल यांचे खाजगी जीवन व राजकारण यांची सरमिसळ करायला नको होती हे खरंच आहे. कारण एकदा का असे झाले की तो पायंडाच पडेल. कोणत्याही नको असलेल्या व्यक्तीच्या वैयक्तिक गोष्टी वेशीवर टांगायच्या व त्याची उचलबांगडी करायला लावायची. असे झाले तर संघटना खिळखिळी होईल. अथाईडबाईंनी या उपोषणाच्या निमित्ताने संघटनेतील घरेलू मामला चव्हाट्यावर आणला, यामुळे बी. पी. सी. सी. बदनाम झाली आहे. श्री. पटेल हे काँग्रेस हायकमांड आणि उद्योगपती यांच्यातील संपर्काधिकाऱ्याचे काम करतात हा आरोप करून त्यांनी एक प्रकारे हाय कमांडलाही बदनाम केले आहे. पटेल आज आहेत उद्या नसतील. संघटना कायम टिकणारी आहे. याचा परिणाम जनमानसावर जरूर होतो. पक्षाचो प्रतिमा डागळली जाते. या उपोषणाचे असे परिणाम होणारच आहेत. पटेलांना कदाचित काही काळाने जावे लागेल. पटेलांनी प्रधानमंत्र्यांकडे राजिनामा पाठविला होता पण तो त्यांनी स्विकारला नाही असे म्हणतात.कदाचित हे वादळ पूर्णपणे शांत झाले, की पटेल हळूच राजिनामा देतील अशी बरीच शक्यता आहे.

पटेल यांच्याविरुद्ध बंड करायला तयार असलेले काँग्रेसजन फार मोठ्या संख्येत आहेत. याची अनेक कारणे आहेत. श्री. पटेल प्रागतिक विचारसरणीचे आहेत हे खरे. पण त्यांनी कार्यकर्त्यांशी बिलकुल चांगले संबंध ठेवले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विचारसरणीशी मिळते जुळते असणारे आणि त्यांच्याबद्दल व्यक्तिगत निष्ठा असणारे त्यांचे चेले सोडले तर सारेच्या सारे काँग्रेसजन त्यांच्यावर नाराज आहेत. रजनीभाईंची हकालपट्टी झाली तर ९५ टक्के कार्यकर्त्यांना दुःखाऐवजी आनंदच होईल, असे बी. पी. सी. सी.च्या एका वजनदार नेत्याने मला

सांगितले. ही टक्केवारी कदाचित अतिशयोक्तिपूर्ण असेल पण म्हणून नाराजीची वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

दुसरे म्हणजे सिंडिकेट विचारसरणीचे अनेक लोक अजूनही नवकाँग्रेसमध्ये आहेत. पटेल अध्यक्ष झाल्यानंतर यापैकी बरीच मंडळी बाहेर फेकली गेली पण तरीही पक्षातील इतर सिंडिकेट मनोवृत्तीच्या लोकांचा फोर्स कायम राहिला. जनता सहाय्यक दल, शिबिरे याद्वारा हा फोर्स उखडण्याचा श्री. पटेल यांनी प्रयत्न सुरू करताच या फोर्सचे अस्तित्वच धोक्यात आले. तेव्हा शेवटचा अटी-तटीचा सामना करण्यासाठी ही मंडळी सिद्ध झाली.

अथाईडबाईंच्या उपोषणामागील बोलविते धनी कोण याची चर्चा करताना या गोष्टींचा विचार करावा लागतो. गेल्या मंत्रिमंडळात मुंबईचे प्रतिनिधित्व करणारे पण या वेळी तिकीट न दिले गेलेले व श्री. स. का. पाटील यांच्या पठडीतील एक माजी मंत्री आणि नव्या मंत्रिमंडळात नव्याने प्रवेश केलेले एक मंत्री, ज्यांचे अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षांकडे दांडगे वजन आहे, (अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षांचे बॅ. रजनी पटेल यांच्याबाबत चांगले मत नसून ते पटेल यांच्याविरुद्ध आहेत असे म्हणतात.) अशा या आजी व माजी मंत्रीद्वयांनी वेगवेगळ्या कारणां-साठी रजनी पटेल यांच्याविरुद्ध दंड थोपटून बाईंना उपोषणाला बसविले, अशी एक कुणकुण आहे.

एम्. पी. सी. सी. व बी. पी. सी. सी.चे संबंधही म्हणावे तसे चांगले नाहीत. याचे कारण असे की, श्री. स. का. पाटील यांनी त्यांच्या सद्दीच्या काळात बी. पी. सी. सी. त्यांची बटीक करून ठेवली होती आणि ती तशी राहण्यासाठी बी. पी. सी. सी.चा सवता सुभा केला. एम्. पी. सी. सी.ला त्यांनी बिलकुल जुमानले नाही. काँग्रेसमध्ये फूट पडली. नवे लोक अधिकारपदांवर आले पण परिस्थितीत खास फरक पडला नाही. याच कारणासाठी, अथाईडबाईंच्या उपोषणामागे एम्. पी. सी. सी.चा कोणीतरी बडा नेता असल्याच्या वावड्या उठल्या होत्या.

मात्र रजनी पटेल जोपर्यंत बी. पी. सी. सी. चे अध्यक्ष आहेत तोपर्यंत त्यांना या ना त्याप्रकारच्या बंडखोरीला तोंड द्यावेच लागेल असे दिसते. कारण सर्वसामान्य कार्यकर्त्यांची नाराजी त्यांनी ओढवून घेतली आहे.

शेवटी अथाईडबाईंच्या उपोषणातील एक आश्चर्यकारक किस्सा सांगून वार्तापत्र संपवतो. अथाईडबाईंना काही दिवसांपूर्वी रुग्णालयात हलविण्यात आले. 'आपल्याला स्पेशल वॉर्ड वा रूम नको आणि आपण औषधे वा इंजेक्शन्स घेणार नाही' असे त्यांनी रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांना लिहून दिले म्हणे. त्या निव्वळ घरून आणलेले पाणी पितात व ते पाणी इतर कोणालाही पिऊ देत नाहीत आणि फक्त (घरचे) पाणी पीत असूनसुद्धा रुग्णालयात आणल्यापासून त्यांच्या वजनात काहीही घट झालेली नाही असे म्हणतात.

सर्वच डॉक्टर्सना हा प्रकार म्हणजे वैद्यकीय क्षेत्रातील एक आश्चर्यकारक चमत्कार वाटू लागला आहे. बाई अतिमानवच दिसतात !

□ □ □

## घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा




त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का ?

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. **निरोध** वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. **निरोध** हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे रबरी संतति–प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे **निरोध** अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि **निरोध** का नाही वापरीत !

**कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

# निरोध ▼

**लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक**

केमिस्ट, वाणी जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/460


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगांवकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649




“ए रामा, तो तुझा फलक उद्या मला देशील ?
आमचा मोर्चा आहे ऑफिसवर उद्या....”